# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

संपादक
डॉ. संभाजी पाटील



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता (संपादित)**
**Dr. Babasaheb Aambedkar Yanchi Patrakarita (Ed.)**
**संपादक :**
डॉ. संभाजी पाटील
**संपादक मंडळ :**
डॉ. गोविंद उफाडे, प्रा. बापूसाहेब जवळेकर
डॉ. शिवराज काचे, डॉ. विजयकुमार करजकर

**ISBN 978-93-5240-198-7**

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७

© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रथम आवृत्ती : ३१ मार्च २०२२
मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर
अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर
मूल्य : ५००.०० रुपये

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी कॉलेज प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

## प्रस्ताव

'मूकनायक' ते 'प्रबुद्ध भारत' आंबेडकर यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनातून जाणवते. नु वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने डॉ. बा मूल्यात्मक चिकित्सा व्हावी, त्यावर साध मराठी विभागाच्या वतीने 'डॉ. बाबासा आणि बोध' या विषयावर एका राष्ट्रीय च आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्याचे, मानवमुक्तीचे पुरस्कर्ते, जलतज्ञ समाजशास्त्र, मानववंशशास्त्राचे अभ्यासक, सामाजिक चळवळीचे प्रणेते आणि उच्च अंगाने सर्वपरिचित आहेत. त्याचबरोबर ऊर्जा देणारी आहे. तरीही त्यांचा पत्रकार विचार करताना दिसत नाहीत. काहींनी प पण तो अतिशय त्रोटक, जुजबी अशा नियतकालिकांचा इतिहास लिहिणारे व मीमां वृत्तपत्र कर्तृत्वाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले पत्रकारिता पोटभरू व प्रचारकी स्वरूपाची पर्यायाने राष्ट्रउद्धाराचे मूलभूत अधिष्ठान डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या 'पत्रकार पत्रकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेले, गांभीर्याने पहिले जावू लागले.

हिंदू धर्म आणि समाजव्यवस्थेने नि बहिष्कृत, सर्वहारा समाजाला बाहेर का आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी वृत्तपत्राची विध्वंस', 'सोमवंशी मित्र' सारखी काही

२६. स्फुट लेखनातील व्यक्तिवेध :
रामा स्वामी नायकर व बॅ. जयकर
डॉ. जयदेवी पवार ........................................ २९५
२७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता :
स्त्री आणि सामाजिक न्याय
डॉ. गुंफा कोकाटे ........................................ ३०२
२८. निर्भीड पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. कविता लोहाळे-ताटे ........................................ ३०६
२९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लेखनविशेष
डॉ. रवींद्र बेम्बरे ........................................ ३११
३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मचिकित्सा
डॉ. सुभाष कदम ........................................ ३२०
३१. डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे स्वरूप
डॉ. मधुबाला हुडगे ........................................ ३२८
३२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वयंसिद्ध पत्रकारिता
डॉ. दुष्यंत कटारे ........................................ ३३२
३३. बाबासाहेबांच्या पत्रकारितेतील प्रबोधन : स्वरूप व चिंतन
डॉ. बालाजी डिगोळे ........................................ ३४१
३४. सत्यशोधक पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. गोविंद काळे ........................................ ३४७
३५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रातून आलेले
शेतीविषयक विचार
डॉ. चंद्रकांत शेरखाने ........................................ ३५२
३६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक चिंतन
डॉ. ज्ञानदेव राऊत ........................................ ३५७
३७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पर्यावरण
डॉ. मल्लिकार्जुन तंगावार ........................................ ३६१
३८. 'बहिष्कृत भारत' मधील साहित्यविषयक विचार
डॉ. केशव आलगुले ........................................ ३६४
३९. 'बहिष्कृत भारत'मधील शिक्षणविषयक विचार
डॉ. गणेश लहाने ........................................ ३७१

# ३०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मचिकित्सा

०००

**डॉ. सुभाष कदम**, लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील भारताच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक पटलावर स्वतःच्या कार्याची आणि विचारांची तप्तमुद्रा उठविणारे क्रांतिकारक जननायक होते. १८९१ ते १९५६ अशा ६५ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी केलेले लेखन, चालवलेल्या चळवळी आणि उभारलेल्या संघटना यांची व्याप्ती पाहिली तर हे सर्व कार्य अभूतपूर्व होते असेच म्हणावे लागते. भारतीय समाजरचनेत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मनुष्य गटाच्या मुक्तीच्या, उन्नतीच्या आसाभोवती त्यांचे एकंदर आयुष्य आणि कार्य फिरत राहिले. अस्पृश्य माणूस हा त्यांच्या विचारांच्या आणि चळवळींच्या केंद्रस्थानी होता. "स्वतःची भूमी परकी ठरलेल्या, धर्माचा आधार नसलेल्या, अन्यायग्रस्त, अभावग्रस्त, पीडित अस्पृश्य मनुष्याला स्वतःची भूमी मिळवून देण्याचे, धर्म मिळवून देण्याचे भव्य स्वप्न त्यांनी पाहिले आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी आयुष्य वेचले."[१] अशा युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, कार्य आणि विचार यांची विसाव्या आणि नंतर एकविसाव्या शतकावर खोल मुद्रा उमटलेली आहे. भारतीय समाजातील दलित, पीडित, निरश्रित माणसांमध्ये आपण माणूस आहेत. याची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि त्यांना माणूसपणाचे हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनभर संघर्ष केला. मूलभूत अधिकारांपासून वंचित असलेल्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. संघटना निर्माण केल्या आणि वृत्तपत्रेही चालवली. नेतृत्वापासून भारतीय संविधानाच्या रचनेपर्यंत वेगवेगळ्या स्तरावर त्यांनी कार्य केले. कायदेपंडित, संशोधक, अर्थतज्ज्ञ, धर्म चिकित्सक, राजकीय नेता, समाज सुधारक, धर्म प्रवर्तक आणि पत्रकार अशा अष्टपैलू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध जीवन पैलू, कर्तृत्व

बंधुता व सर्वांना समान संधी याचा लोकशाहीने पुरस्कार केला आहे. परंतु हिंदू समाजातील काही अनिष्ट रूढी, परंपरा मात्र आजही बदलेल्या नाहीत. त्यांनी धर्म म्हणजे काय हे प्रथम समजून घेतले पाहिजे. त्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार नक्कीच मार्गदर्शन करतील. त्यांचे समग्र साहित्याचे वाचन सर्वांनी करावे. त्यांच्या विचारांची जयंती साजरी करावी लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**


१. वसंत अबाजी डहाके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रवर्तन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, जानेवारी २००८, पृ. २५

२. गंगाधर पानतावणे, पुरस्कार, बहिष्कृत भारतातील अग्रलेख, संपा. रत्नाकर गणवीर, रत्नमित्र प्रकाशन, भुसावळ

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबुद्ध भारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध दीक्षा विशेषांक, २७ ऑक्टोबर १९५६

४. रणसुभे सूर्यनारायण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राधाकृष्ण प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ. ८०

५. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, २००४, द्वि. आ. पृ. १४

६. वसंत आबाजी डहाके (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८ दु. आ.

७. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ २८१



**डॉ. सुभाष कदम,**

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

भ्रमणध्वनी - ९८३४८२१६७१


ooo



मूकनायक

“आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमान पत्रासारखी अन्य भूमीच नाही...”

“समाज ही एक नौकाच आहे. व ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा त्यांची त्रेधा कशी उडते ही गम्मत पाहण्यासाठी म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधि ही घ्यावीच लागणार आहे. त्याच प्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार, यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करण्याचे पढतमूर्खांचे लक्षण शिकू नये. हा बुद्धिवाद ज्यांना कबूल आहे अशी वर्तमानपत्रे निघाली आहेत हे सुदैवच म्हणावयाचे...”

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

(‘मूकनायक’ व ‘बहिष्कृत भारत’च्या पहिल्या अग्रलेखातून)



बहिष्कृत भारत

ISBN 978-93-5240-198-7

9 789352 401987

**अरुणा प्रकाशन, लातूर**

१०३, ओंकार कॉम्पलेक्स-अ, खर्डेकर स्टॉप,
औसा रोड, लातूर मो. ९४२१४८६९३५



# साहित्यसरिता

- संपादक :

- प्रा.डॉ. सुनीता सांगोले
- प्रा.डॉ. मधु सावंत
- डॉ. सुभाष कदम

अथर्व पब्लिकेशन्स

**साहित्यसरिता**

(Sahitysarita)

© मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ISBN : 978-93-90288-99-1

पुस्तक प्रकाशन क्र. ८०९

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.

**संपर्क :** ९४०५२०६२३०

**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी, तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.

**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

**ई-मेल :** atharvapublications@gmail.com

**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** ३० जानेवारी २०२१

**मुद्रितशोधन :** दीपक महाले

**मुखपृष्ठ :** विशाल लोहार

**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** १००/-

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*

☛ **व्याकरण विभाग**

१. समास - द्वंद्व, बहुव्रीही ................................................१०२

२. अलंकार : उत्प्रेक्षा, रूपक, उपमा ..................................१०९

(१)

# समास

– डॉ. सुभाष कदम

माणूस दैनंदिन जीवनामध्ये जशी काटकसर करतो, तशीच भाषेचा उपयोग करताना शब्दांची काटकसर केली जाते. दोन किंवा अधिक शब्द वापरण्याऐवजी त्याचा एकच शब्द वापरतो. उदाहरणार्थ – 'चंद्राचा उदय' असे न म्हणता आपण 'चंद्रोदय' असे म्हणतो. पुरण घालून केलेली पोळी न म्हणता 'पुरणपोळी' असे म्हणतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणास 'समास' असे म्हणतात. म्हणजेच दोन किंवा अधिक शब्दांचा परस्परसंबंध दाखविणारे शब्द किंवा प्रत्यय लोप पावून त्या दोन किंवा अधिक शब्दांचा जो एक स्वतंत्र शब्द तयार होतो, त्या शब्दास 'सामासिक शब्द' असे म्हणतात आणि त्या दोन किंवा अधिक शब्दांचा जो संयोग होतो त्यास 'समास' असे म्हणतात. 'सम् + अस्' या संस्कृत धातूपासून 'समास' हा शब्द तयार झाला असून, त्याचा अर्थ 'एकत्र करणे' असा आहे. 'समास' दोन किंवा अधिक शब्दांपासून होतो. हे शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आपण फोड करून सांगतो. या फोड करून दाखविण्याच्या पद्धतीला 'विग्रह' असे म्हणतात. उदाहरणार्थ – 'तोंडपाठ' हा सामासिक शब्द आहे. 'तोंडाने पाठ' या दोन शब्दांपासून तो तयार झाला आहे. विग्रह करताना तोंडाने पाठ असा करावा लागतो आणि सामासिक शब्द तयार होताना 'ने' हा विभक्तीचा प्रत्यय लुप्त होऊन एकच शब्द तयार होतो. विग्रह गाळलेले शब्द घालून करावा लागतो. दोन किंवा अधिक शब्द जेव्हा एकत्र येतात, तेव्हा ते संधिनियमांप्रमाणे एकत्र येतात. संस्कृत शब्दांमध्ये ही संधी होण्याचे प्रमाण जास्त आहे.

उदाहरणार्थ –

लंब + उदर = लंबोदर

दश + आनन = दशानन

मनस् + भंग = मनोभंग

**समासाचे प्रकार**

सामासिक शब्द तयार होत असताना कमीत कमी दोन शब्द किंवा पदे

उदाहरणार्थ - अनंत, नीरस, अनादी, निर्धन, निरोगी, निःशब्द, अज्ञान, अनाथ, अकर्मक इत्यादी.

इ) **सहबहुव्रीही समास -**

सादर - आदराने आहेत असा तो (नमस्कार)

सहकुटुंब - कुटुंबाने सहित असा जो (गृहस्थ)

सपुत्र, सक्रमंक, सहोदर, सहपरिवार, सवर्ण, सफल.

वरील सामासिक शब्दातील पहिली पदे स, सह, अशी अव्यये आहेत. हे शब्द विशेषणासारखे आली आहेत. यास 'सहबहुव्रीही समास' म्हणता.

ई) **प्रादिबहुव्रीही समास -** बहुव्रीही समासाचे पहिले पद जर प्र, परा, अप, दूर, सु, वि अशा उपसर्गांनी युक्त असेल तर त्यास 'प्रादिबहुव्रीही समास' म्हणतात. या समासातील पूर्वपद हे अव्यय असते.

उदाहरणार्थ - प्रवर्ण, सुलोचना, निर्घृण, निर्दय, निष्फल, विफल, उन्मुख, नीरस, विमुख, कुरूप, विरागी, दुर्गुणी इत्यादी.

या सामासिक शब्दात पूर्वपद हे उपसर्ग किंवा अव्यय आले आहे. (प्रादि = प्र आदि उपसर्ग असलेले)

**अन्य प्रकार -**

बहुव्रीही समासातील दोन्ही पदे कोणत्या प्रकारची आहेत, त्यावरून बहुव्रीही समासाचे प्रकार केले जातात. यामध्ये पदे ही विशेषण, उपमान, संख्या इत्यादी प्रकारे येतात. त्यावरून त्याची नावे दिली आहेत.

अ) **विशेषण पूर्वपद -** नीलकंठ, लंबोदर, सुग्रीव, इत्यादी बहुव्रीही समासातील पहिले पद हे विशेषण आले आहे.

ब) **विशेषणोत्तरपद -** गुडप्रिय, पायाशुद्ध या सामासिक शब्दात दुसरे पद विशेषण येते.

क) **उपमानपूर्वपद -** कमलनेत्रा, चंद्रमुखी, शशिवदना या शब्दांतील पूर्वपद हे उपमान आहे.

ड) **लुप्तपद किंवा मध्यमपदलोपी -** मृगनयना, हरिणाक्षी, मुद्राराक्षस इत्यादी बहुव्रीही समासातील मधली पदे गाळलेली आहेत.

इ) **संख्यापूर्वपद -** त्रिनयन, एकदंत, चतुर्भुज, अष्टभुजा इत्यादी बहुव्रीही समासातील पहिले पद हे संख्या आहे.

ई) **संख्योत्तरपद -** उपदश, त्रिसप्त या शब्दातील दुसरे पद संख्या आहे.

उ) **दिगंतराल बहुव्रीही -** दोन दिशांच्या मधील दिशा दाखविणारा -

## विद्यापीठ गीत

विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा
मानवतेचा मंगलमय हा इथे खेळतो विश्वधारा ।।धृ.।।

तेजोमय उजळितो प्रकाश
श्रमाचे, कष्टाचे आकाश
संपविते सौदामिनी, युगांचा अंधार सारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।१।।

चंदनाची व्रतस्थ भूमि
प्रज्ञा, प्रतिभा गगनगामी
समतेचा ममतेचा हा साधनेचा अढळ तारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।२।।

बुद्धकरुणेचा विहार इथे
शिवरायाचा आचार इथे
निरंतर न्यायासाठी स्वातंत्र्याचा इथे पहारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।३।।

विचार विवेक विज्ञानाचे
ज्ञानतीर्थ हे महात्मतेचे
मातीच्या मोहराचा गोदावरीचा इथे किनारा
विद्येची अन् पवित्रतेची इथे वाहते ज्ञानधारा ।।४।।

**– फ. मुं. शिंदे**

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...
- pejbook.com
- amazon.com
- Google Play Books
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-90288-99-1
Rs - 100/-

Impact Factor 6.293

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VII | ISSUE-III | Mar. | 2020

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 30 | पूनम रानी | मैथिलीशरण गुप्त के काव्य में उर्मिला की विरह वेदना | 127 To 129 |
| 31 | डॉ. अनिल उत्तम मोरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | 130 To 133 |
| 32 | डॉ. पद्मा मोहनराव जाधव | महाराजा सयाजीराव गायकवाड | 134 To 136 |
| 33 | पिरजादे सद्दामसो हजरतसो | कोरोग्रस्त जागतीक आर्थव्यसस्था | 137 To 140 |
| 34 | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | आंबेडकरी विचाराला वाहिलेले काव्यपुष्प "क्रांतिपर्व" | 141 To 147 |
| 35 | डॉ. सुभाष कदम | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान व चळवळींचा मराठी साहित्यावरील परिणाम | 148 To 150 |
| 36 | डॉ. अनिल उत्तम मोरे | शिक्षणाची दिशा आणि दशा – एक चिंतन | 151 To 154 |
| 37 | प्रा.डॉ. किशन सुनेवार | वैदिक साहित्यातून प्रतित होणारे सरस्वती नदीचे ऐतिहासिक महत्व | 155 To 159 |
| 38 | डॉ. विभा देशपांडे | ग्राम सक्षमीकरण कार्यात बचत गट व सहकारी संस्थाची भूमिका | 160 To 163 |
| 39 | डॉ. कैलास सर्जेराव मोटे | भारतातील सामाजव्यवस्था व मानवी हक्क / मानवाधिकार : एक दृष्टीक्षेप | 164 To 168 |
| 40 | **डॉ. पद्मा मोहनराव जाधव** | **प्रभावी अध्यापनासाठी प्रशिक्षणार्थ्यांद्वारे शिक्षक मूल्यमापनाची उपयुक्तता** | 169 To 174 |
| 41 | प्रा. डॉ. डी. डी. माने<br>प्रा. पद्माकर बळीराम तटाळे | स्थानिक स्वराज्य संस्था उदय व विकास | 175 To 178 |
| 42 | प्रा.परमेश्वर माणिकराव वाकडे | सामाजिक और आर्थिक दृष्टि से किन्नर समुदाय | 179 To 181 |
| 43 | प्रा.परमेश्वर माणिकराव वाकडे | हालातों से जूझता किसान | 182 To 184 |
| 44 | प्रा. जनार्दन भाऊ वारघडे | मोखाडा तालुक्याच्या आदिवासी विकासासंदर्भात कृषि योजनांचे योगदान | 185 To 187 |

VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच तत्त्वज्ञान व चळवळींचा मराठी साहित्यावरील परिणाम

**प्रा. डॉ. सुभाष कदम**
सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

मराठी साहित्यात आज विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झालेले आहेत. याची सुरूवात स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मराठी साहित्य लेखकांविषयी विचार केला तर ते एक विशिष्ट वर्गातील होते. पुणे, मुंबई इत्यादी मोठ्या शहरांत राहणारे होते. त्यांची जगण्याची व जीवनानुभव घेण्याची पद्धत भिन्न होती. त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा भिन्न होत्या. 1945 नंतर साहित्य लेखनाच्या प्रेरणा बदलल्या. दुसरे महायुद्ध, सिग्मंडफ्राईडचा मानसशास्त्रीय विचार, कार्लमाक्स यांचा साम्यवादी विचार, आइन स्टॉईनचा भौतिकशास्त्रातील अनु–रेणुमधील शक्तीचा सिद्धांत, विज्ञानाचा पाश्चात्य देशात झालेला विकास व त्यांचा भारतीय जीवनावर झाललापरिणाम, विज्ञानातून तंत्रज्ञानाचा विकास, औद्योगिकिकरण, शहराची भरमसाठ वाढ यांच्या प्रभावातून व परिणामातून 1945 चे मराठो साहित्य बदलत गेले आणि याच काळात भारताला 1947 मध्येस्वातंत्र्य मिळाले.

1947 नंतर भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. महाराष्ट्रातही शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार स्वातंत्र्यानंतर झाला. 1956 ला भाषावार प्रांतरचना झाली. मराठी भाषिकांचे एक स्वतंत्र्य राज्य असावे म्हणून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ निर्माण झाली. याचा परिपाक म्हणून 01 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राज्य सरकारने शिक्षणाचा प्रसार केला. यासाठी गावागावांत प्राथमिक व माध्यमिक शाळांची निर्मिती केली. शासनाच्या शिक्षणाच्या प्रयत्नासोबतच काही समाजसुधारकांनीही शिक्षणामध्ये योगदान दिले. कर्मवीर भाऊराव पाटील, यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षण गावा–गावापर्यंत पोहचविले. तसेच बापुसाहेब साळुंके यांनी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. अशा कितीतरी संस्था महाराष्ट्रात उदयास आल्या. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना 1948 मध्ये केली. या संस्थेअंतर्गत मुंबई आणि औरंगाबाद येथे महाविद्यालये व वसतिगृह निर्माण केले. या महाविद्यालयातून दलित समजातील तरूणांनी शिक्षण घेतले आणि ही केंद्र दलित चळवळीचे केंद्र बनलो. म्हणून दलित साहित्याच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. दलित साहित्याच्या निर्मितीमागील इतर प्रेरणांचाही अभ्यासक उल्लेख करतात. यामध्ये तथागत गौतमबुद्ध, संत कबीर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले–सावित्रीबाई फुले, यांचीही प्रेरणा मानली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्ध, संत कबीर व महात्मा फुले यांना गुरू मानले होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरांच्या जीवनावर आणि विचारप्रणालीवर होताच पण आंबेडकरांच्या कार्य–कर्तृत्वातून दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली. म्हणूनदलित साहित्याच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही.

भारतीय समाज मनच्या मनस्मृतीत आणि वर्णव्यवस्थेच्या साखळीत बांधला गेला होता. या जोखडामध्ये समाजाला ठेवण्याचे कार्य हिंदूधर्मव्यवस्थेतील कर्मट लोकांनी केले. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ही समाजाची वर्णव्यवस्था होती. यातील शुद्र समाजाला दुःखद आणि प्रशुप्रमाणे वागणूक दिली जात होती. याच्या विरूद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ उभी केली. यासाठी आंबेडकरांनी विविध सत्यगृह ववैचारिक लेखन केले, त्यातून आंबेडकरी चळवळ उभी राहिली. त्यामुळे दलित समाजाला आत्मभान व स्वत्वाची जाणीव झाली. शिका–संघटित व्हा–संघर्ष करा!, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो पेईल ता गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असा संदेश आंबेडकरांनी दिल्यामुळे दलित समाजातील तरूणात आत्मभान आले. आणि तो हिंदू धर्मव्यवस्थेतील कर्मट व्यवस्थेविरूद्ध बंड करून उठला. याविषयी डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''स्वातंत्र्योत्तर

कालखंडातील एक महत्त्वाचा वाङ्मयप्रवाह म्हणून दलित साहित्याचा विचार अपरिहार्यपणे करावा लागतो. दलित साहित्याचे उर्जाकेंद्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान हे आहे. ह्या क्रांतीकारी तत्त्वज्ञानाचे जीर्ण मनुष्यताविरोधी मूल्ये, माणसाचे अवमूल्यन व प्रतिमाहनन करणारे धर्मग्रंथ व त्यातील विचार नाकारले. सर्व प्रकारचे शोषण नाकारले आणि समताधिष्ठित समाजरचना, मानवी स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायमूल्य स्वीकारले. ही नवी मानसिकता होती. नवी आयडेंटिटी होती. दलित साहित्य याच नव्या अस्मितेचे वाहक होते व आहे. दलित साहित्यातून नव्या वाङ्मयीन जाणिवा व नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती प्रकट झाल्या. कविता, कथा, नाटय, कादंबरी, आत्मकथन, वैचारिक व संशोधनपर लेखन इत्यादी नवी मुद्रा घेऊन ते मराठी साहित्यवि वात प्रतिष्ठित झाले.''

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी कार्यातून आणि वैचारिक अधिष्टानातून निर्माण झाले आहे असे म्हणतात. दलित साहित्याची एक प्रमुख प्रेरणा म्हणून डॉ. बाबासाहेबांचा उल्लेख करावा लागतो. मराठीमध्ये दलित साहित्याचा प्रवाह 1960 नंतर प्रखरपणे मराठी साहित्यात अधोरेखित किंवा ठळकपणे दिसू लागतो. दलित साहित्याच्या प्रेरणांचा विचार केल्यास विविध विचारवंत साहित्यिक आपल्या काव्यातून, कथातून आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करतात. तेव्हा केवळ दलित म्हणून जन्म घेतलेले व लिहिले ते दलित साहित्य नाही तर आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानातून उदयास आलेल्या नव्या विद्रोही जाणिवांचे जे साहित्य तेच दलित साहित्य होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या बहुविध कार्याचा प्रभाव मराठीतील दलित साहित्यावर पडला. त्याच्या कार्याचे आपणांस विभाग करावे लागतील. त्यामध्ये हिंदू धर्मव्यवस्थेच्या नावाखाली व वर्णव्यवस्थेच्या नावाखाली दलित समाजाची होत असलेली पिळवणूक पाहूण त्यांनो समाजामध्ये समता, स्वातंत्र्य व न्याय मिळावा, अस्पृ त्वाची प्रथा दूर व्हावी म्हणून चळवळी उभ्या केल्या. त्यासाठी आंदोलन व उपोषण केले. त्यामध्ये महाड येथील चवदार, तळयाचा सत्यागृह, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, अस्पृश्यांना राखीव मतदार संघ मिळावे म्हणून केलेला सत्यागृहइत्यादी कितीतरी आंदोलने त्यांनी उभी केली आणि या आंदोलनात दलित समाज मोठया संख्येने सहभागी झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आंदोलने आणि विचार अस्पृश्यांच्या शेवटच्या झोपडीपर्यंत नेण्यासाठी शाहिरांनी प्रयत्न केले. आंबेडकरांच्या आंदोलनामुळे शाहिरांना आत्मभान आले. समाजभान आणि आत्मभान राखूनच दलित शाहिरांनी आपली कवने लोकमनावर बिंबवली. त्यांनी जुण्यापरंपरेतील इष्काची लावणी लिहली नाही. किंवा लोकरंजन म्हणून लिहिले नाही. लोकजागृतीची बांधिलकी स्वीकारूनच त्यांनी आंबेडकर निष्ठा व्यक्त केली. यामध्ये भाऊ फक्कड, हरिभाऊ तोरणे, केरूबुवा गायकवाड, केरूजी घेगडे, रामचंद्र हरि बनसोडे, भीमराव कर्डक, अर्जुन हरी भालेराव अशा अनेक दलित शाहिरांनी आंबेडकरांच्या विचारासाठी शाहिरी गायली. परंपरागत शहिरांची परंपरा त्यांनी नाकारली. पूर्वी गणेशाला प्रथम नमन केले जायचे. या शाहिरांनी आपले मार्गदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकतृत्वाला नमल केले. या जलाशयातून आंबेडकरांच्या दलित मुक्तीलढयांची, राजकीय आणि सामाजिक हक्काच्या जाणिवेची, स्वातंत्र्य, समता, न्याय, याची मागणी केली. अंधश्रध्दा, अस्पृश्यता, विटाळ, हिंदू धर्मग्रंथ हे शाहिरांच्या उपहासाचे विषय बनले. 1950 नंतरही शाहीरांनी लेखन चालूच ठेवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दुसरे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे समाजप्रबोधन करण्यासाठी त्यांनी लेखन केले. दलित, पिडीत, शोषित समाजात प्रबोधन निर्माण करणे ही त्यांची लेखनदृष्टी होती. त्यांनी धर्म व धर्मग्रंथांची चिकित्सा केली. सवर्ण आणि वर्णव्यवस्थेखाली अस्पृश्यांची कशी पिळवणूक केली जाते याची पुनः पन्हा जाणीव करून दिली. त्यांनी 1920 नंतर मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता या आपल्या पत्रांतून विचारप्रवर्तक असे लेखन केले. सामाजिक क्रांतीसाठी प्रथम समाजात वैचारिक क्रांती हवी लागते, असे त्यांचे मत होते. आज समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, साहित्य, संस्कृती, इतिहास, शिक्षण, अर्थकारण, राजकारण या विषयांवर त्यांचे लेखन आहे. आणि विशेषतः त्यांनी इंग्रजी लेखन येत असताना इंग्लंडमध्ये शिक्षण घेतले असताना सर्वात जास्त लेखन मराठीमध्ये केले. या लेखनातून त्यांनी समता, स्वातंत्र्य, न्याय, बुद्धिप्रामान्यवाद याचा पुरस्कार केला. याचा प्रभाव मराठी साहित्यावर पडला.

आंबेडकराच्या लेखनाचा अन्वयार्थ तत्त्वज्ञानाचा प्रभाव मराठो दलित साहित्यावर पडला. हीच दलितसाहित्य लेखनाची प्रेरणा होय. मराठीत भारतीय धर्मग्रंथांची चिकित्सा करणारे भरपूर लेखन झाले. यातून मराठी दलित साहित्यातूनही आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय, बुद्धिप्रामाण्यवाद याचा पुरस्कार केला. प्रा. दि. मा. खैरकर, ना. रा. शेंडे, खैरमोडे, रा. ठ. इंगळे, दीनबंधू शेगावकर, हि. ल. कोसारे, शंकरराव खरात, वसंत रत्नाकर गणवीर, रावसाहेब कसबे, गंगाधर पानतावणे, ताराचंद्र खांडेकर, यशवंत मनोहर, रा. का. क्षीरसागर, नामदेव ठसाळ, रामनाथ चव्हाण, उत्तम कांबळे, धनराज डाहाट, अरूण कांबळे, रा. ग. जाधव इत्यादी अनेक अभ्यासक विचावंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा पुरस्कार करणारे ग्रंथ लिहिले.

डॉ. बाबासाहेबआंबेडकरांनी या विचारांचे सर्व सार अनेक लेखांमधून, ग्रंथांमधून केले. त्यांनी भारत स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधान निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय लोकशाहीच्या निर्मितीसाठी आंबेडकरांच्या योगदानाबद्दल आपल्याकडे त्यांच्या गौरवासाठी शब्दच नाहीत. त्यांनी वृत्तपत्रातून, भारतीय राज्यघटनेतून व सामाजिक चळवळीतून समाजप्रबोधन केलेच त्याशिवाय त्यांच्याकडील आणखीन महत्त्वपूर्ण गुण म्हणजे वक्तृत्व, त्यांनी आपल्या जीवनामध्ये अशी कितीतरी भाषणे केली असतीलज्याचा प्रभाव सर्वसामान्यांवर खूप पडला. साध्या आणि सरळ भाषेमधून त्यांनी भाषणे केली. त्यांनी राजकारणातही सक्रीय सहभाग घेतला. स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीच्या सर्वोच्च सभागृहात म्हणजे लोकसभेत अस्पृश्याचे प्रतिनिधित्व केले. अस्पृश्यांचे प्रश्न मांडले. या सर्वाचा प्रभाव पडून दलित समाजातील तरूण जागृत झाला. त्यांना आत्मभान आले. त्यांनी साहित्यलेखनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडले. मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक, शाहिरी, काव्य, आत्मकथन या वाङ्मय प्रकारातून लेखन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा केली आणि हिंदू धर्म मानसाला माणूस म्हणून वागवत नाही. म्हणून 1956 मध्ये लाखो अनुयायासोबत धर्मपरिवर्तन केले आणि बौद्धधर्माची दीक्षा घेतली. आज बौद्ध धर्म भारतात गौतमबुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार, तत्त्वज्ञान आचरण करणारा धर्म आहे. या सर्व विचारप्रवाहाचा, सामाजिक चळवळीचा, वैचारिक लेखनाचा प्रभाव मराठो दलित साहित्य लेखनावर आहे. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, त्र्यंबक सापकाळे, दया पवार, यशवंत मनोहर, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर इत्यादी कवींनी कवितेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन लेखन केले. दलित समाजाच्या वेदना मांडल्या, अनिष्ठ प्रथेविषयी नकार दिला. आणि अन्यायग्रस्त रूढीविषयी विद्रोह निर्माण केला. दलित आत्मकथनातून दलित समाजातील दुःख मांडले. प्र. ई. सोनकांबळे, दया पवार, माधव कोंडविलकर, लक्ष्मण माने, शंकरराव खरात, कुमुद पावडे, उत्तम बंडूतुप,नानासाहेब झोडगे, मुक्ता सर्वगोड, शरणकुमार लिंबाळे, बेबी कांबळे, लक्ष्मण गायकवाड इत्यादींनी आत्मकथनातून मराठी दलित साहित्याची एक वेगळी ओळख निर्माण केली. एकूणच मराठी साहित्यामध्ये दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच निर्माण झाली. हे सर्व मराठीतील अभ्यासक समीक्षकांना मान्य करावेच लागल.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली दलित चळवळीचे प्रतिबिंब दलित साहित्याच्या चळवळीतून उमटले व मराठी साहित्य यातून समृद्ध झाले.

## संदर्भ सूची

1. जाधव रा. ग. (संपा)— मराठी वाङ्मयाचा इतिहास (खड 7, भाग चाथा), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
2. काळे अक्षयकुमार— अर्वाचित मराठी काव्यदर्शन, पा. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर
3. अडसूळ टी. पी.— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य
4. जाधव रा. ग.— निळी पहाट : मराठी दलित साहित्याची मीमांसा
5. मनोहर यशवंत— दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप
6. फडके भालचंद्र— दलित साहित्याची प्रकाशयात्रा
7. डांगळे अर्जून (संपा.)— दलित साहित्य : एक अभ्यास

VOL- VII ISSUE- IV APRIL 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# निशाणी डावा अंगठा : कादंबरी आणि चित्रपट

**प्रा.डॉ. सुभाष माणिकराव कदम**
सहाय्यक प्राध्यापक
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

'निशाणी डावा अंगठा' ही रमेश इंगळे यांची बहुचर्चीत कादंबरी आहे. ही कादंबरी उघडउगड शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करणारी कादंबरी वाटते; पण तिच्यातील विवध विषयांची चर्चा, पात्रांचे संवाद यावरून या कादंबरीत एकच विषय आला आहे असे मात्र म्हणता येणार नाही. यापूर्वी मराठी साहित्यात कादंबरी वाङ्मयाची 1857 पासूनची दीर्घ परंपरा आहे हे पहाता कादंबरी वाङ्मयाने नवीन नवीन विषय हाताळलेले दिसतात. हरीभाऊ पूर्व व हरीभाऊची कांदबरी, वा. म.जोशी व श्रीधर व्यंकटेश केतकर यांची कादंबरी, ना. सी. फडके व वि. स. खांडेकरांची कादंबरी, र. वा. दिर्घ व श्री. ना. फेंडसे यांची कादंबरी इत्यादी कादंबरीकारांनी मराठी साहित्याला नवीन विषय देऊन वळन लावले. 1960 नंतर मराठी साहित्य वास्तवादाकडे जास्त ओळखले दिसते. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य या साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्यात वास्तव समाज चित्रित केले. त्याअर्थाने 'निशाणी डावा अंगठा' ही वास्तववादी कादंबरी आहे. एक वेगळा विषय घेऊन लिहिली गेलेली कादंबरी आहे.

'निशाणी डावा अंगठा' ही कादंबरी 2005 मध्ये प्रथम प्रकाशित झाली. त्यानंतर या कादंबरीच्या 2006, 2007, पुन: 2007 व 2009 आणि नंतरही पुनमुर्द्रन करून आवृत्या निघाल्या. या वरून या कादंबरीची वाचळप्रियता होती व लोकप्रियता आपणास लक्षात येते. 1960 नंतर जे मराठी साहित्य विविध रूपांनी येऊ लागले त्यात वास्तविकता होती. रंजनवादी लेखन आले पण त्यांची संख्या कमी होत गेली. त्या अर्थाने ही 2005 मध्ये वास्तविक समजा दर्शनावर लिहिलेली कादंबरी आहे. त्यातही या कादंबरीत मुख्य प्रश्न आला आहे तो साक्षरता अभियान. महाराष्ट्र शासन जनहितार्थ कितीतरी योजना जाहीर करते; पण त्याची शासकीय पातळीवर अंमलबजावणी मात्र हास्यास्पद होते. मंत्रालयापासून ते खालच्या स्तरापर्यंत फक्त कागदी घोडे नाचवले जातात. ती योजना कागदी आकड्यावरून यशस्वी झालेली असते. याचे चित्रण या कादंबरीत केले आहे. साक्षरता अभियान हा या कादंबरीचा मुख्य विषय आला आहे. लेखक रमेश इंगळे स्वत: प्राथमिक शिक्षक होते व नंतर त्यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेत काम केले आहे. यावरून लेखकाने हे सर्व समाजामध्ये पाहिले आहे. लेखकाकडे सूक्ष्म निरीक्षण करण्याची कला आहे. जी सर्व व्यक्तीकडे असत नाही. महात्मा गांधी जयंती

निमित्त 2 ऑक्टोबर 1997 ला साक्षरता अभियानाची घोषणा केली जाते व ते पुढे तीन वर्ष चालणार असते. या साक्षरता अभियानाचे प्रत्यक्षात काय झाले ते लेखकाने पाहिले आहे. ते वास्तव या कादंबरीच्या रूपाने मांडले आहे. त्यांनी यासंदर्भात कादंबरीतच सुरूवातीला, "दा. गो. काळे, मनोज सुरेंद्र पाठक,मंगेश नारायण काळे, रवींद्र इंगळे, दिनकर दाभाडे, दिनकर मनवर, प्रकाश नागोलकर, अनंत सिरसाट, अनिल राजपूत, गजानन मुदलीयार, राजेंद्रबापू पाटील ही 'शब्दवेध'च्या गोतावळ्यातील माझी माणसं या लेखनाच्या मुळाशी आहेत. आमच्या रंगलेल्या गप्पांच्या फडातच या लेखनाचे बीज गवसले" असे लेखक कादंबरीच्या निर्मितीमागील मूळ कथानक कसे सूचले ते सांगतो.

ही कादंबरी शिक्षण विभाग, गावातील शाळा यांच्या वातावरणात घडते. महाराष्ट्र शासन ज्या वेळेस साक्षरता अभियानाची घोषणा करते. त्यावेळी बुलढाणा जिल्ह्यात साक्षरता अभियान सुरू होणार आहे व त्याच्या अमल बजावणीसाठी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाची नेमणूक केली जाते. यासाठी रंगनाथ भास्कर डुकरे यासाठी अर्ज करतो. अर्ज करताना त्याच्या मनात ना दिवसभर शाळेत जाणे ना टाईमची कटकट असल्यामुळे दिवसभर बायको जवळ राहता येईल म्हणून तो यासाठी उत्सूक असतो व त्याचीच निवडही केली जाते. अशीच प्रत्येक शाळेतून एक पूवेका निवडला गेला. प्रत्येक गावात निरक्षरांचे सर्वेक्षण, 10 निरक्षराचा एक गट, त्यासाठी एक स्वयंसेवक व एक शिक्षक नेमायचा आणि दररोज रात्री आठ ते दहा या वेळेत या निरक्षरांना साक्षर करण्यासाठी प्रयत्न करायचे अशी ही योजना होती. गावागावातून सर्वेक्षण केले जाते, त्यांच्या यादया तयार केल्या जातात, त्या वरिष्ठांकडे पाठविल्या जातात. गटशिक्षण अधिकारी, केंद्रप्रमुख, रात्रीची शाळा तपासणी करण्यासाठी भोनगाव, सावरगाव इत्यादी गावात जातात. या सर्व प्रसंगाचे चित्रण या कादंबरीत आले आहे; पण तपासणी करताना कोणत्याही गावात या साक्षरता अभियानाचे वर्ग सुरू आहेत असे दिसत नाही. सर्वजण कागदोपत्री हजऱ्या, अहवाल तयार करतात. शिक्षक, स्वयंसेवक एकमेकांना सांभाळून घेतात. हे अभियान तीन वर्ष चालते व शेवटी अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व बाह्यमूल्यमापन परीक्षा घेऊन साक्षरता अभियान पूर्ण यशस्वी झाले असे कादोपत्री जाहीर केले जाते. वर्तमानपत्रात बातम्या येतात. जिल्ह्यांना पुरस्कार मिळतात, त्याच्याही बातम्या येतात. कागदावर 100% साक्षर झाले असे रिपोर्ट जातात व जिल्हा 100% साक्षर म्हणूनही घोषीत केला जातो. असे कादंबरीचे साररूपाने कथानकआहे.

या कादंबरीचा सूक्ष्मपणे विचार केला तर या कादंबरीत तीन विभाग आपणास करता येतील. साक्षरता अबियान राबवणारे प्रशासन व अधिकारी, प्रत्यक्ष निरक्षरांना शिकवणारे शिक्षक आणि तिसरा निरक्षर या तिघांचीही साक्षरता अभियानाविषयी उदासीन भूमिका दिसते. साक्षरता अभियानातील शिक्षक निरीक्षक व निरक्षर ज्या वेळेस संवाद करतात त्यावेळी ते

सद्याची सामाजिक, राजकीय, स्त्रीयांची परिस्थिती, जातीवाद, धर्म, दैववाद, भ्रष्टाचार, शिकलेल्या स्त्रियांवर भाष्य, ब्राह्मण पुजारी, पूजा इत्यादींवर ते मार्मिक, उपहासात्मक पण वास्तव उपरोधक शैलीत बोलतात. हे संवाद जणू सद्याची परिस्थितीच बोलून जाते आणि यातून वाचकांना विचार करायला गंभीर केल्याशिवाय रहात नाही. उदाहरणार्थ काही संवाद...

प्रायमरी टिचर म्हणजे नोकरीच नाही हे सरकारनं सालानं ठेवल लोकं हायेत.कव्हा कोणत्याबी कामाले जुपा, बैलावानी हायेतच तयार. इलेक्शन आलं... तयार, जनगणना आली... तयार, पल्स पोलिओ... तयार, लोकशाहीचे ऑपरेशन करा कशाचाही सर्वे आला तरी शिक्षक तयारच. “अहो, हे निरक्षर तर आपल्याकडून बापजन्मात साक्षर होणार नाहीत; पण या भानगडीत शाळांतली ही पोरं मात्र निरक्षर झाल्याशिवाय राहणार नाहीत.” दुसरा संवाद

“भाऊ, असे महत्वाचे कागद जमा करून आपली अलमारी भरली. प्रत्येक सरकारी कागद महत्वाचाच असतो, फक्त त्याला महत्व किती द्यायचं हे आपलं आपणच ठरवायचं असतं.” तिसरा संवाद

“काही वाढत-फिढत नाही, हा तुमचा कागद वाचतंय कोण, तिथं कोणाले रिकामपण हाये, आपण इथं मार अक्षर चांगलं काठ, समास सोड, ही ओळ बदल, तो शब्द खोड, शिक्का पुसट झाला, पुन्हा मार, जावक लाल शाईत लिही, हया भानगडी करतो.तिथं हा कागद कोठंजाऊन पड्ल, सांगतासी येत नाही. या अभियानाचे मारे साऱ्या गावाहीचे अहवाल रोज ऑफिसात येऊन पडतेत. त्याहीले कोणी हुंगतली नाही. हे कागदाहीले गड्डे झाले. आॅफिसात साहेबाची खुर्ची ठेवायलेबी जागा नाही. त्या गंजात आपला कागद जाऊन पडला तर पुन्हा पाहायचा म्हणाला तं सापडणार नाही. आहो, हे काही खरं नाही. समद असंच चालू हाये. त्याहीनं मिळून दोन ओळी धाडल्या की आपूण इकडून चार ओळी धाडायच्या. त्याहीनं म्हणलं,हे हे पाठवा; तं आपण थातूर मातूर आकडे भरायचे अन् म्हणायचं हे हे सेवेशी सादर. त्याहीन म्हणलं की तुम्ही टाळटाळ करता; तं आपण म्हणायचं, नाही, हे राष्ट्रीय कायं आम्ही निष्ठेने करतो. त्याहीनं म्हणलं, तुमचे वर्ग भरत नाहीत; आपण म्हणायचं, नियमित भरतात. त्याहीन म्हणलं, निरक्षरांना अजून अंक-ओळख नाही; आपून म्हणायचं बेरीज-वजाबाक्या करतात. त्याहीन म्हणलं, अक्षर ओळख नाही; आपून म्हणायचं, निबंध-पत्र लिहितात. बस... असचं चालू द्याचं. आपला शेंडा वाकू द्यायचा नाही, जिभंचाबी आणि पेनायाबी अन् आपून का कबूल केलं की मंग ते उरावरच बसतेत. त्याकरता त्याहीले चान्सच द्यायचा नाही.”

“अधिकारी लोक हे कागदांशीच बोलत असतात आणि कागदाचचं एकत असतात.”

कादंबरीतील वरील संवाद सरकारी यंत्रणेवरभाष्य करतात. यात अस्सल विदर्भातील भाषा आली आहे. यातून सरकारी अधिकारी, योजना राबवणारी यंत्रणा यांचा कागदी कारभार यांच्यावर उपहासात्मक शैलीत हे संवाद वास्तव

चित्रण करतात.

शिक्षण व्यवस्थेत साक्षरता अभियाना विषयी शिक्षकांची ही भूमिका होती. शासनाकडून विविध योजना शिक्षकांच्या माध्यमातून राबवल्या जातात. पण शिक्षकांचे मूळ कार्य विद्यार्थ्यांना शिकवणे आहे. हे शासन लक्षात घेत नाही. त्यांना योजना राबवायची असते. यशस्वी करायची, किती झाली, कशी झाली, साध्य काय झाले याचा विचार कोणी करतो की नाही, हे कादंबरीतून लेखक सूचवत आहे.

या कादंबरीत प्रशासकीय अधिकारी योजना राबवण्याविषयी ही उदासीन दिसतात. जिल्ह्यालाच कलेक्टरपासून ते मुख्याध्यापकांपर्यंत सारी यंत्रणा कागदाच्या अकड्यावर चलते. सीओ, उपसीवो, बीडीओ, बीओ, चाळीस एडीआ, पैठ इओ, चारपाच प्रौढ प्रोजेक्टर इओ, 130 केंद्रप्रमुख, 130 कार्यकर्ता, अभियानाचे काही जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक, निरीक्षक, शिक्षक सुमारे 7000 एवढी यंत्रणा साक्षरता अभियानासाठी जिल्ह्यात कार्यरत असते. हे सर्व कागदावर चालते. या सर्वांना साक्षरता अभियान यशस्वी करायचे असते तेही कागदावरच. त्यासाठी सर्व अधिकारी एकमेकांना आदेश देत राहतात. तात्काळ, अतिमहत्त्वाचे, कामात दिरंगाई केली तर कार्यवाही, हे राष्ट्रीय कार्य आहे, दोन दिवसात अहवाल पाठवा, यामध्येच प्रशासकीय यंत्रणा गुंतलेली अते. अहवाल पाठवणे, वरिष्ठांकडे माहिती देणे याचेच टेन्सन यांना असते.याचे टेन्शन व माहितीही निरक्षरांना नसते. ज्याच्यासाठी ही यंत्रणा राबवली जाते त्या दोन लाख निरक्षरांना याचे काही देणेघेणे नसते. निरक्षरांना अक्षरधारा भाग-1, भाग-2, भाग-3 शिकवून झालेत, त्यांच्या वाचन-लेखन अंकज्ञान क्षमता तपासल्या, त्याचे गुणदान झाले, आपल्या गावातील सर्व निरक्षर साक्षर झालेत, हे सर्व रेकॉर्ड सागतं. रेकार्ड जे सांगतं तेच खरं, बाकी मग कोणी कितीही ओरडले तरी त्याला अर्थ नसतो. आधिकाऱ्यांच्या पुढे असते रेकॉर्ड आणि रेकॉर्डच्या मागे असतात अधिकारी अशी प्रशासनातील परिस्थिती कादंबरीकार दाखवतात. ती शिक्षकांच्या, अधिकाऱ्यांच्या संवादातून साक्षरता अभियानावर तर भाष्य करतातच, त्याशिवाय प्रशासकीय कारभाराचा गोंधळही आपणासमोर चित्रित करतात.

या शासकीय रेकॉर्डमध्ये निरक्षरांची नावे असतात. पण त्या निरक्षरांना यासंदर्भात काही माहीत नसते. कागदोपत्री ते साक्षर असतात पण प्रत्यक्षात ते निरीक्षरच असतात. ही योजना निरक्षरांसाठी आहे हे खरे आहे. पण त्याचे प्रश्न आणखीन वेगळे आहेत. तो म्हणजे भाकरीचा प्रश्न शिक्षक निरक्षराकडे गेल्यास निरक्षर जे बोलतात ती ग्रामीण समाजातील माणसांचे वास्तव आहे. “का हो गुजी, आता समजा, आम्ही शिकलोबी, तं आमाले काय भेटणार हाये? जवा शिकायचं वय होतं तवा काही कोणं आमाले हात धरून बसवलं नाही.शालंत ये म्हंटलं नाही. आता काय राहयलं? अर्ध उबार जगणं झालं, बर, आमाचे लिव्हता-वाचता येत नवतं तरी आमचं तं काही आडलं नाही बुवा एवढ्या जिंदगानीत.

बिनशिकल्यानं काही आडत नसल तं शिकून बी काय फायदा? सांगा गुजी, तुमीच सांगा." (पृ. 10) तं गुर्जी, जंव्हाच्या गोष्टी तव्हाच केल्या तं बऱ्या ऱ्हातात. आता कामधंदा करून आपलं, पोराहीचं पोटं भरायचं का पाटी-पुस्तक घेऊन, क कढईचा क, ब बदकाया ब, करत बसयाचं? तुमी नराज होऊ नका गुर्जी, पण हे आसं हाये, राजे हो. तुमीबी का तुमच्या मनानं म्हणता म्हणा. तुमाले तिकडून वरून येतो दट्‌या, तवा तुमी बिचारे फिरता यांच्या घरून त्यांच्या घरी अन् त्यांच्या घरून यांच्या घरी." (पृ. 11) हा ग्रामीण माणसांचे प्रश्न शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित करतात. आजच्या शिक्षणातून रोजगाराच्या व जगण्याचे प्रश्न मिटत नाहीत. त्यात या निरक्षरांच्या भूमिकाही निराशावादी दिसतात. तोंड पाण्यापर्यंत न्या की पाणी तोंडापर्यंत आणा. प्यायची इच्छाय नसेल तर काही खरं नाही. शिक्षक आणि प्रशासन तरी काय करणार. अशी निरक्षरांची परिस्थिती या कादंबरीत चित्रित केली आहे. यावरून निरक्षरांचाही दोष नाही. त्याना पोटाचा प्रश्न मिटण्यापुढे दुसरे सूचतच नाही. ग्रामीण भागातील गरिबी दु:ख, भाकरीचा प्रश्न गंभीर आहे.

ही कादंबरी वास्तवदर्शन करणारी आहे. या कादंबरीचे कोणत्या वाङ्मय प्रवाहामध्ये वर्गीकरण करता यईल अशा प्रश्न उपस्थित केला तर या कादंबरीला ग्रामीण कादंबरी म्हणावे लागेल. कारण ही कादंबरी साक्षरता अभियानावर भाष्य करणारी असली तरी या कादंबरीतील कथानक घडते ते खेड्यामध्येच. भोनगाव, सावरगाव, मुंगळा, ही गावे व तेथील वातावरण या कादंबरीत येते. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा व त्या गावातील पात्र या कादंबरीत येतात. ही सर्व गावे विदर्भातील दाखवली आहे. अर्थातच या कादंबरीत विदर्भातील वऱ्हाडी भाषेची लकब पात्राच्या तोंडी येणाऱ्या संवादातून वेळोवेळी जाणवतेही. ज्याले, त्याले, लोकहिले, मले हे शब्द वऱ्हाडी भाषेतील या कादंबरीत वेळोवेळी आले आहेत. लेखकाने म्हणी, वाक्प्रचार यांचाही वापर केलेला आहे. उदा. उंदराले गवसची चिंदी, इथं ठेऊ का तिथं ठेऊ, सौ बकी और एक लिखी, चोरलमध्ये हिरो आणि पॉक्टिकलमध्ये झिरो इत्यादी म्हणीचा वापरही कादंबरीचे भाषिक सौंदर्य वाढवतात. भाषेची लकब वापरून त्या त्या पात्रांचे व्यक्ती वैशिष्ट्ये, स्वभाव वाचकांसमोर लेखक चित्रित करतात. कादंबरी वाचत असताना वाचक त्या वातावरणाशी, ग्रामीण बोलीशी, व्यक्ती वैशिष्ट्याशी तल्लीन होऊन जातो. एवढी सहजता आणि निवेदनातील शैली वाचकांना मोहून टाकते व वाचक या कादंबरीतील पात्रांच्या संवादावर, विचारावर, प्रभावीत होतो. उपहास, विरोधाभास आणि निडंबन या कादंबरीत पानापानातून नोंद येतो. त्यातून लेखक समाजचिंतन करतो आहे. सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. शिक्षण व्यवस्था कूचकामी झाली आहे. प्रशासनातील अधिकारी स्वार्थापोटी कागदोपत्री का होईना साक्षरता अभियान यशस्वी दाखवतात. पाटी, पेन्सील, स्वाध्याय, गंड्डाळफळा, शाळा भेटीचा

दौरा केला नसले तरी दौरा दाखवतात, 10 लिटर डिझेल टाकले तरी पावती वाढवून घेतात. यातून समाजातील भ्रष्टाचार शिक्षण व्यवस्थेतही कसा आहे हे दाखवतो. जनतेचा कराच्या माध्यमातून आलेला पैसा विविध योजनांसाठी वापरला जातो पण त्यातून साध्य काहीही होत नाही. शिक्षण योजनेतील भ्रष्टाचार विषयाचे संवाद पुढील प्रमाणे येतात.

"कोण शिकून राहिलं, अन् कोण शिकवून राहिलं. त्याहिले तं आयतं करण भेटलं होतं, सगळे चरत होते कुरणात. वरून किती आले, खाली किती पोचले अन् मधात किती गायब झाले, माहीत हाय तुमाले? करोडोनं आले वरून, खाली थोडेसे शिपडले अन् बाकीचे मधातच गायब झाले." (पृ. 215)

"ह्या दोन-दोन रूपयांच्या टपऱ्या पाट्या, वीस-वीस रूपयेला लावेल हायते म्हणतात, किती पाट्या घेतल्या पुऱ्या जिल्ह्यासाठी? दोन लाख, एका पाटीवर अठरा रूपये, दोन लाख गुणिले अठरा, करा हिशेब तुम्हीच. त्या निरक्षर राहिले तं शंभरात एकावर किती शुन्य तेबी समजत नाही. लाखाची तं गोष्ट दूरच. पण त्यांच्या जीवावर मजा केली सगळ्यांनी. हे तं नुसतं पाट्याहीचं सांगतिलं. लेखनाहीले डब्बे, रबरं, पेन्सिली, गुंडाळी फळे, हजऱ्या, अक्षरधारहीचे पुस्तकं... अजून काय काय असलं जे तुमाले-आमाले माहीतबी नसल. सगळ्याहीचा हिशोब करसाल तं आपल्या पुऱ्या जिल्ह्यातल्या मास्तरलोकाहीचा वर्षभराचा पगारबी होत नाही तितका. शिकवणाऱ्याले खडकू नाही, काय तं त्यों स्यवंसेवक. अन् मास्तर तं दावणीले उभाय हाये, कुणं बी जुपा... बिचारा! महिनाभर गांड घासतो त्याचे तीन-तीन महिने पगार नाही. पुन्हा त्याच्याच उरावर बसायले सगळे तयार. तुम्ही काहीच करत नाही. तुमच्या इथं काहाय काम नाही.. " (पृ. 215) पण सर, हे आपल्याला बोलता येत नसतं. सगळ्यांना कळतं, कुठं कशी-कोणाची डाळ शिजते? पण आपण मूग गिळून चूप बसायचं. आपल्याला सांगितलं ते करायचं निमूट. जमत नसले तर करायचं नाही पण एक शब्द काढायचा नाही, मला तुम्हीच सांगा आपण काय करू शकतो?" (पृ. 215-16) ही असे साक्षरता आभियानाच्या भ्रष्टाचारावरही चर्चा या कादंबरीत येते. त्याशिवाय अंध:श्रद्धा, दैववाद ही याविषयी कादंबरीकार मर्मक शब्दात वाचकांला सागंतो. या कादंबरीतील काही पात्र दैववादावर सडेतोड बोलताना दिसतात. सावरगावच्या शाळेतील हेडमास्तर भाऊसाहेब यांच्या तोंडी पुढील भाषा येते. "लोकांमधल्या अंध:श्रद्धेला असं विधायक वळण खरंच देता येऊ शकतं. मृत्यूचं किंवा आपत्तीचं भय माणसाकडून काहीही करून घेऊ शकतं. आपला देश तर या गोष्टीत मोठा नग आहे. माहिती, तंत्रज्ञानाचं युग आलंय म्हणतात. एकविसावं शतक हे तंत्रज्ञानाचे शतक आहे असं आताशा हमखास वाचनात येतं. या एकविसाव्या शतकात आपल्याच देशात कुठं कॉम्प्युटरचे वर्ग चाललेत तर कुठे साक्षरतेचे, किती विसंगती आहे ही!" (पृ. 172) समाजामध्ये देवीच्या नावावर पत्रिका वाटल्या जातात. जो कोणी इतक्या इतक्या पत्रिका वाटेल त्याला हे हे

यश मिळेल. अशी कोणीतरी साक्षरता अभियानासाठी निरक्षरांच्या दैववादाचा व अंध:श्रद्धेचा फायदा आपण घेऊ शकतो याची दोन्ही बाजूने चर्चा करतात. कादंबरीतील सावरगाव शाळेतील मुख्याध्यापक राठोड बी. बी. म्हणतात, "मी श्रद्धाळू माणूस आहे. मी जितका श्रद्धाळू आहे, तितकाच विज्ञानवादीही आहे. माझा देवावर आणि विज्ञानावर सारखीच श्रद्धा आहे. मी देवाच्या ठिकाणी देवाला व विज्ञानाच्या ठिकाणी विज्ञानाला मानतो. अशा पत्रिकांमधली गोष्ट खरी नसते हे मला कळतं. मला जर संतोषीमातेचं पत्र आलं तर मी सोळा किंवा त्यात सांगितली असतील तितकी पत्रं इतरांना धाडल्याशिवाय राहणार नाही. आता, ह्या पत्रिकेतील मजकूर खोटा आहे हे मला कळतं, परंतु मी ती फाडू शकत नाही. त्यासाठी लागणारी हिंमत माझ्याजवळ नाही. याला तुम्ही काय म्हणायचं ते म्हणा आणि मलाही मुर्ख म्हणायचं की शहाणा, अर्धमुर्ख की अर्धशहाणा, काय ते तुम्हीच ठरवा. आपला कशालाच विरोध नाही." (पृ. 172) दुसरे शिक्षक त्यांना म्हणतात "भाऊ, अनिश्चित असली तरी तुमच्याजवळ निदान भूमिका तरी आहे. तुमचं कसं सर्व स्पष्ट आणि स्वच्छ. आत एक आणि बाहेर एक असं नाही. पण इतरांजवळ अशीही भूमिका नसते ते पूर्ण अंधश्रद्धाळू असतात आणि अंधश्रद्धेलाच शहाणपणा समजतात याचा मला संताप येतो." या शाळेतील एकाने अशी पत्रिका फाडली व सहा स्त्री शिक्षिकांनी तर त्या पत्रिकांना नमस्कार करून पर्समध्ये ठेवल्या. आपल्यासारख्या शिकल्यासवरल्या लोकांतही भीतीचे भूत किती लवकर बसते. माणसाला देव दाखवला तर माणूस काहीही करायला तयार होईल. अन् त्यात प्रत्येकाला मरणाची खूप भीती असते. उपाशीतपाशी का होईना माणसांना जगावे वाटते. ज्याला त्याला जगणे गोड वाटते. हे समाजाचे मानसशास्त्रीय विश्लेषण सर्वांनाच मान्य करावे लागेल. ही कमी जास्त सर्व खेड्यापाड्याची स्थिती लेखक या रूपाने ध्वनीत करतो. कादंबरीतील ही चर्चा, दैववाद अंध:श्रद्धा भारतीय समाजातील कर्मटपणा यावर मार्मीकपणे भाष्य करते म्हणजे तत्वज्ञानच वाटते. यातील एक एक संवाद ही कादंबरी भारतीय स्त्रियांच्या सामाजिक स्थानाविषयीही चर्चा करते.

स्त्रीयांच्या सामाजिक स्थानावर निरक्षण स्त्री व साक्षर स्त्रियांविषयी शिक्षिका म्हणते, “सर, शिकणं... नोकरीसाठी बाहेर पडणं... आणि पगार कमावणं म्हणजे काही स्वतंत्र होणं नसतं. शिकलेल्या, कमावणाऱ्या बायांचे प्रश्न या अडाणी निरक्षर, पैशांशी संबंध न येणाऱ्या बायांपेक्षाही खूप वेगळे आहेत. आणि हे प्रश्न त्यांच्या शिक्षणानं आणि पैशानंच निर्माण केलेत. कधीकधी तर या अडाणी निरक्षर बायाच आमच्यापेक्षा सुखी आणि मुक्त वाटतात. आम्हाला अज्ञानात सुख असतं आणि बंधनात मुक्ती असते हे त्यांच्याकडं बघून कळतं. आमच्या बंधनाची आम्हाला जाणीव होते. ती बोचत राहते. पण बंधनं झिडकारण्याचं बळ आम्हाला कमावता येत नाही. या अडाणी बायांना बंधन म्हणजे काय तेच कळत नाही. त्यामुळे त्यांना त्याची सल नसते. बोच नसते. म्हणून

एका अर्थाने त्या मुक्त असतात. आम्ही उंबरठे ओलांडून, कमरेला पदर खोचूनही पिंजऱ्यात असतो तर त्या उंबरठ्या आत, डोक्यावर पदर घेऊन त्यांच्याच का होईना पण आकाशात भरारत असतात." (पृ. 70-71) सिग्मॉन दि बोव्हाच्या द सेकंड सेक्स या ग्रंथाचा सारच हे स्त्रि पात्र बोलते. ही शिकलेल्या स्त्रियांची परिस्थिती समाजात आहे. एक शिक्षिका स्त्री पात्र या ठिकाणी बोलत आहे. शिकलेल्या स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्यावर हे मार्मीक भाष्य आहे. या कादंबरीतील सावरगाव शाळेतील जुबंड, जावाई पाचपांडे, विठोबा,, नवलाखे मुख्याध्यापक बी.बी. राठोड ही अशी पात्रे लेखकाने निर्माण केली आहेत. की त्यांचे संवाद म्हणजे समाजचिंतन, राजकारणावर भाष्य, जातीवादावर, धर्म, दैववाद, अंध:श्रद्धा स्त्रीयांची परिस्थिती, राजकारण, भ्रष्टाचार यावर ते मार्मीक बोलतात. जणू वाचकांना असे वाटते की समाजातील वास्तव चित्रणावर भाष्य करणारी ही तत्वज्ञानी माणसे आहेत. ही पात्र वाचकांच्या नेहमी लक्षात राहतील अशी प्रभावशाली आहेत. स्त्रियांच्याच परिस्थितीविषयी बी. बी. राठोड हे पात्र म्हणते, "संगीत खुर्चीचं म्हणाल तं गावतल्या नव्वद टक्के बाया अजून खुर्चीवर बसल्याबी नसतील, आधी त्यांच्यात खुर्चीवर बसण्याची ताकद निर्माण करावी लागंन. अजूनही खेडेभागात बाईनं वरच्या आसनावर बसण्याची मानसिकता नाही. बाई, पण या लोकाहीले हे कोण सांगावं? स्पर्धा घ्या... घेतला, कार्यक्रम घ्या... घेतला.अहवाल पाठवा... पाठवला."(पृ. 134) हा संवाद संद्याची स्त्रियांची वास्तविक परिस्थिती सांगतो. या कादंबरीत साक्षरता अभियाना निमित्त समाजचिंतन लेखक मांडतो आहे. शासकीय योजनांची परिस्थिती मांडतो आहे. सरकार आणि प्रशासन, सर्व सामान्य जनता यांच्यामध्ये समन्वयच नसतो. साक्षरता अभियानाच्या निमित्ताने मिटिंगावर मिटिंगा घेतल्या जातात. त्यातून एकच सूर उमटतो की, एक वेळ शाळेचे काम म्हणजे अध्यापनाचे काम मागे ठेवा तरी चालेल, परंतु जे निरक्षर आहेत ते साक्षर झालेच पाहिजेत. हीच परिस्थिती झाली आहे. निरक्षरांना साक्षर करण्यामध्ये ज्यांना साक्षर करण्याचे ते निरक्षर राहत आहेत अशीही वास्तविका या कादंबरीतून येते.

मराठीत काही कादंबरीवर चित्रपटही निघाले. त्यांपैकी "निशाणी डावा अंगठा" या कादंबरीवरही "निशाणी डावा अंगठा" या नावानेच मराठी चित्रपट निघाला. यावरूनच या कादंबरीतील विषय, पात्र, संवाद, भाषेची वऱ्हाठी शैली हे किती म्हत्वाचे आहेत हे आपणास लक्षात घ्यावे लागतील. कारण कोणत्याही कादंबरीवर चित्रपट निघताना निर्माता, दिग्दर्शक, कलाकार त्या कादंबरीतील कथानक प्रभावशाली होईल का? याचा विचार करतात. तो त्यांनी या कादंबरीत पाहिला व त्याचे फलीत म्हणजे तो कादंबरीप्रमाणे लोकप्रियही झाला. मी सुरूवातीला चित्रपट पाहिला व नंतर कादंबरी वाचली. पण चित्रपटापेक्षा कादंबरी मला सरस वाटली. कादंबरी वाचताना पात्रांच्या तोंडून येणारी भासा, दैववाद, भ्रष्ट व्यवस्था शिक्षाकांचे मूळ कार्य व सरकार

देत असलेली अतिरिक्त कार्य, राजकारण, अंध:श्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रियांची सामाजिक परिस्थिती व स्थान, देवदैवता व पूजा, ब्राह्मण ग्रामीण माणूस, त्यांचे प्रश्न, गरिबी, शिक्षणातून निर्माण होणारी बेकारी म्हणजेच शिक्षणाचा कुचकामीपणा इत्यादी प्रश्नांबाबत येणारे संवाद वाचकांना गंभीर करतात. कादंबरीतील पात्र जणू एका एका विषयावर अभ्यासपूर्ण चर्चा करत आहेत. तत्त्वज्ञान सांगत आहेत. सद्यस्तिथीवर भाष्य करत आहेत. तसेच गंभीर सामाजिक प्रश्न उपहासात्मक शैलीत सांगत हसवतात व चिंतन करायला लावतात. चित्रपटात हे सर्वच घटना प्रसंगावर अधारित विषय घेतलेले दिसत नाही. चित्रपटही सरस ठरला आहे पण वाचक आणि प्रेक्षक या दोन्ही भूमिकेतून मी पाहिले तर मला कादंबरी श्रेष्ठ वाटली. सावरगावची शाळा केंद्रस्थानी ठेऊन चित्रपट निर्मिती केली आहे. कादंबरीत सावरगावच्या शाळेतील घटना प्रसंग जास्त आहेत पण इतरही शाळेतील घटना प्रसंग कादंबरीच्या प्रारंभी आल्या आहेत. पण इतर शाळेतील प्रसंग चित्रपटात आले नाहीत. त्यात चित्रपटसृष्टी व व्यवसाय म्हणून काही मर्यादा असतीलही. ब्राह्मण पूजाऱ्याची पत्नी शाळेतील (सावरगाव) पाठकसाई आहे पण चित्रपटात केंद्रप्रमुख बोकीलबाई ही दाखवली आहे. पण कादंबरी जशी विषय मांडणी मुळे वेगळी ठरली तसाच चित्रपटही प्रेक्षकप्रिय ठरला हे मात्र नाकारता येत नाही.

या कादंबरीची समीक्षा समाजशास्त्रीय, चरित्रात्मक, मानसशास्त्रीय अशा विविध अंगानेही करता येऊ शकते. पण विषय विवेचनाची मर्यादा लक्षात घेता काही दृष्टिकोन समोर ठेऊन या कादंबरीची समीक्षा मी केली आहे. माझ्या अकलनाच्या काही मर्यादा असतीलही हे मी मान्य करून येथे मी थांबतो...

### संदर्भ सूची

१.इंगळे रमेश, निशाणी डावा अंगठा, ग्रंथाली प्रकाशन , मुंबई,२००५,
२.शोभणे रवींद्र, त्रिमिती, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३
३.जाधव रा. ग. (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ७ ,भाग २,म.सा.प.पुणे, २००९
४.थोरात राजेंद्र, कुंकू ते दुनियादारी, चपराक प्रकाशन, पुणे, २०१९

VOL- VII ISSUE- V MAY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# देशभक्तांच्या चळवळीचे दुःखानुभव चित्रित करणारी कादंबरी : वारणेच्या खोऱ्यात

**प्रा.डॉ. सुभाष कदम,**
सहाय्यक प्राध्यापक,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर

अण्णा भाऊ साठे मराठी साहित्यात असे साहित्यिक होऊन गेलेले आहेत की त्यांची तुलना मराठी साहित्यातील कोणत्याही साहित्यिकांशी होऊ शकत नाही. त्यांचा लेखनाचा पिंडच इतर साहित्यिकांपेक्षा नक्कीच भिन्न होता. त्यांनी १९३७ मध्ये मराठी साहित्य लेखन करण्यास सुरुवात केली. कथा, कादंबरी, पोवाडे, वगनाट्य, नाटके आणि प्रवास वर्णन इत्यादी साहित्यप्रकारांत त्यांनी लेखन केले. अण्णा भाऊ साठे यांच्या पर्यंत मराठी साहित्यात लेखन करणारे साहित्यिक हे मोठ्या शहरांमध्ये म्हणजेच मुंबई आणि पुणे इत्यादी शहरांतील होते, शिवाय विशिष्ट वर्णातील होते. त्यांच्या लेखनातील वातावरण, विषय, व्यक्तिरेखा किंवा नायक हे पांढरपेशीय वर्गातील होते. मनोरंजनासाठी साहित्य लेखन केले जात होते. त्याला काही अपवाद असतीलही पण ते नगण्यच. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून दीन-दलित समाजातील नायक-नायिका आपल्या लेखनाचा विषय बनविला. त्यांनी जे लेखन केले ते जीवनानुभवातून लेखन केले. आतापर्यंत त्यांनी पाहिलेल्या साहित्यातून नायक-नायिका या मुंबई-पुणे शहरातील, पांढरपेशीय वर्गातील किंवा पाटील वतनदार या होत्या. अण्णा भाऊ साठे यांचा वाटेगाव ते मुंबई हा प्रवास पूर्णतः संघर्षमय आहे. तो त्यांनी आपल्या साहित्यातून मांडला. त्यांचा पिंड क्रांतिकारकांचा होता आणि त्यांचा जन्मही क्रांतिकारकांच्या जन्मभूमीत झाला होता. हा वारसा घेऊन 'वारण्याचे खोरे' त्यांनी साहित्यातून अजरामर केले. या प्रदेशातील जीवनावर लिहिलेली एक कादंबरी म्हणजे 'वारणेच्या खोऱ्यात' ही होय. त्यांनी एकूण प्रकाशित व अप्रकाशित ३७ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचे सर्वात जास्त लेखन हे कादंबरी वाङ्मय प्रकारात झाले आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाची पार्श्वभूमी पाहताना विविध अंगाने विचार करावा लागेल. यामध्ये प्रथम विचार करावा लागेल तो म्हणजे याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलित उद्धाराची चळवळ निर्माण झाली होती. दीन-दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी चळवळी उभ्या केलेल्या. माणसाला माणूस म्हणून वागवले पाहिजे. यासाठी त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता न्यायाचा पुरस्कार केला. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनातून, वर्तमानपत्रातून, भाषणातून व कार्यातूनच सतत मांडला. भारतीय दलितांचा उद्धार कार्याकडे सर्व जगाचे लक्ष होते. अण्णा भाऊ साठे यांच्या विचारावरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा प्रभाव पडला म्हणून त्यांनी जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मला भीमराव।। या गीतातून व फकिरा कादंबरीच्या अर्पण पत्रिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली माणसे, रुढी परंपरेला, धर्म व्यवस्थेला, जातिव्यवस्थेला नाकारणारी माणसे अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून आणली. त्यांच्या लेखनाची दुसरी पार्श्वभूमी म्हणजे तत्कालीन कालखंडामध्ये भारतात ब्रिटिशांच्या विरोधात निर्माण झालेले लढे. एकूणच स्वातंत्र्य चळवळीचे वातावरण त्यांच्या अवतीभवती होते. त्यांचा जन्मच सातारा सांगली परिसरातील एका वाटेगाव खेड्यात, वारणेच्या खोऱ्यात झाला होता. या परिसरात स्वातंत्र्याची चळवळ मोठ्या जोमाने सुरू होती. म्हणून अण्णा भाऊ साठेंनी कथा, कादंबरी, नाटक, वगनाट्य, शाहिरी पोवाड्यातून स्वातंत्र्याची चळवळ उभी केली. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध उतरणारी निर्भिड माणसे त्यांच्या साहित्यातून आली म्हणून वारणेच्या खोऱ्यात ही

कादंबरी वारणेच्या खोऱ्यातील स्वातंत्र्य लढ्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांची कहाणी सांगते.

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनाचा विचार केला तर गरिबीमुळे त्यांनी वाटेगाव ते मुंबई पायी प्रवास केला. त्यानंतर त्यांनी मुंबईमध्ये गिरणी कामगार म्हणून काम केले. तेव्हा त्यांनी तेथील कामगार, त्यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले आणि त्याच वेळी त्यांचा कामगार चळवळीशी संबंध आला. त्यामुळे त्यांनी मार्क्सवादी साहित्य वाचले. मॅक्झिम गार्कीच्या कथा वाचल्या. कार्ल मार्क्स, लेनीन यांचे विचार त्यांनी वाचल्यावर त्यांच्या जीवनावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांनी कम्युनिस्ट पक्ष संघटना यामध्ये कामही केले आणि आयुष्यभर पुढे साम्यवाद प्रत्यक्ष कृतीतून आणि साहित्यातून मांडला. वरील पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य लेखनाचा विचार करावा लागेल. खऱ्या अर्थाने शाहू-फुले-आंबेडकरांचे विचार आपल्या कृतीतून व साहित्यातून त्यांनी मांडले. स्वतः त्यांनी जीवनानुभव घेतलेले वातावरण, दीन-दलित वस्त्यातील माणसे, त्यांचे जीवन, पोट तिडकीने कथा कादंबऱ्यातून मांडणारा एकमेव लेखक म्हणजे अण्णा भाऊ साठे होय. एक विशेष म्हणजे दीड दिवस शाळेमध्ये गेलेल्या एका व्यक्तीने एवढी प्रचंड मराठी साहित्य निर्माण करावे त्यातून स्वातंत्र्याची चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, आंबेडकरवाद, अंधश्रद्धा, दैववाद, विज्ञानवादी दृष्टिकोन, कार्ल मार्क्स यांचा साम्यवाद, धर्मांधता, पृथ्वी ही नागाच्या मस्तकावर उभी नाही तर ती कामगारांच्या हातावर उभी आहे, ये आझादी झूठी है, जनता सब भुकी है। इत्यादी क्रांतिकारी विचार मांडावेत हे एक आश्चर्यच आहे.

'वारणेच्या खोऱ्यात' ही अण्णा भाऊ साठे यांची इ. स. १९४९ मध्ये प्रकाशित झालेली पहिली कादंबरी आहे. ही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उतरलेल्या क्रांतिकारकांच्या जीवन संघर्षाची कहाणी आहे. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या विषयी पद्मश्री नारायण सर्वे म्हणतात, "अण्णांनी लिहिलेल्या एकूण सर्व कादंबऱ्यांपैकी त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्यात ही कादंबरी महत्त्वाची आहे. पुढे ही कादंबरी मंगला या नावानेही प्रकाशित झाली."[१] १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर होता. त्यातही सातारा-सांगली जिल्हा या क्रांतीमध्ये अग्रेसर होता. सातारा जिल्ह्यातील ऑगस्ट क्रांतीच्या उठावात वारणेच्या खोऱ्यातील कितीतरी तरुण सहभागी झाले होते. त्यामध्ये स्वतः अण्णा भाऊ साठे यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. म्हणून या कादंबरीत स्वातंत्र्यलढ्यात आपले घरदार सोडून सहभागी झालेले कितीतरी तरुण या कादंबरीतील अण्णा भाऊ साठे यांनी चित्रित केले आहेत. म्हणून 'वारणेच्या खोऱ्यात' ही १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या लढ्यावर आधारलेली कादंबरी आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी या कादंबरीत क्रांतिकारकांच्या लढ्याविषयी दोन भूमिका मांडल्या आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यात क्रांतिकारकांना ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध संघर्ष करायचा होता. हा एक संघर्ष होता. त्याशिवाय स्वकीयांशीही संघर्ष करायचा होता. इंग्रज हे भारतात राज्य करू शकले त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना आपल्याकडील काही स्वकीयांचे सहकार्य लाभले होते. त्यामुळे ब्रिटिशांना येथे जुलमी राजवट करता आली. अशा दोन पातळीवर संघर्ष करताना क्रांतिकारकांच्या दुःखद जीवनानुभवाचे चित्रण ही कादंबरी करते. या कादंबरीत दोन्ही प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा चित्रित करून तत्कालीन स्वातंत्र्य लढ्याची अनुभूती वाचकांना उपलब्ध करून दिली आहे. क्रांतिकारकांमध्ये हिंदुराव हे प्रमुख पात्र आहे. हिंदुराव सोबत मल्हारी, गणू, शिवा, आबासाहेब, खाशाबा हे ही क्रांतिकारक आपले घरदार सोडून भूमीगत काम करत आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे म्हणून ब्रिटिशांविरुद्ध व ब्रिटिशांना मदत करणाऱ्या स्वकीय सोबत लढत आहेत. या विचारावर आधारित या कादंबरीत कृष्णाजी पाटील, त्यांची पत्नी राधाबाई, मुलगी मंगला यांच्या घरातील हंबीर यांच्याशी संघर्ष या कादंबरीत आला आहे. कृष्णाजी पाटील हे वतनदार असतात. ते क्रांतिकारकांना मदत करतात. त्या गावातील शिवारामध्ये राहू देतात. हिंदुराव व त्यांच्या सहकाऱ्यांना जेवण देतात. या रूपाने क्रांतिकारकांना मदत करणारे कुटुंब किंवा गावाचे वतनदार म्हणून कृष्णाजी पाटील हे पात्र या कादंबरीत येते. क्रांतिकारकांना मदत करण्यावरून कृष्णाजी पाटील व त्यांचा मुलगा हंबीर यांच्या घरातील संघर्ष या कादंबरीत दाखविला आहे. हंबीर आपली बहीण मंगला हिचा विवाह चिखलवाडीचा नागोजी पाटील यांच्याशी व्हावा म्हणून प्रयत्न करत असतो. तो चिखलवाडीला नेहमी जातो; पण नागोजी पाटील हा इंग्रजांना मदत करणारा, क्रांतिकारकांना

पकडून देणारा, शेतकरी मजुरांना लुटणारा, सावकारी करून जमिनी लाटणारा, विश्वास घात करून आबासाहेब सारख्या क्रांतिकारकांना मारणारा, स्वार्थासाठी वेळप्रसंगी इंग्रजांची संगनमत करणारा, आपल्या गावात व परिसरात दरारा निर्माण व्हावा म्हणून गुंड पाळणारा असतो. त्याच्या या प्रवृत्तीमुळे मंगल त्याच्या सोबत विवाह करण्यास तयार नसते. मात्र तिचा भाऊ हंबीर तो जमीनदार, संपत्तीवान आहे म्हणून त्याच्या बहिणी सोबत विवाह व्हावा म्हणून प्रयत्न करत असतो. अशा प्रवृत्तीचे नागोजी पाटील हे पात्र अण्णा भाऊ साठे यांनी निर्माण केले आहे. ही एक तत्कालीन इंग्रज धार्जिनी समाजातील प्रवृत्ती क्रांतिकारकांच्या दुःखाला कारणीभूत होती.

ब्रिटिशांना मदत करणाऱ्या पात्रांमध्ये चिखलवाडीचा जमीनदार व सावकार नागोजी पाटील, देववाडीचा दत्तू, पुणाळचा सत्तू आणि बिदरचा महादू रामोशी ही ब्रिटिशांना मदत करतात. हे वारणेच्या खोऱ्यातील स्वातंत्र चळवळीतील वातावरण अण्णा भाऊ साठे या पात्राच्या रूपाने चित्रित करतात. चिखलवाडीचा जमीनदार नागोजी पाटील हा सुरुवातीला बंडामध्ये सामील होता. त्याला तुरुंगात ब्रिटिशांनी जेल बंद केले होते. पण आपली शेती, आपला चिरेबंदी वाडा, आपले गावात असलेले मान सन्मान याचा विचार त्याच्या मनात सतत येई. यासाठी त्यांनी इंग्रजांना सहकार्य केले. क्रांतिकारकांना पकडून देईल म्हणून त्याने जेलरची माफी मागितली. म्हणून त्याला इंग्रजांनी बंधमुक्त केले. पुढे तो इंग्रजांसाठी काम करू लागला. नंतर त्याने आपल्या क्रांतिकारकांचा विश्वासघात करून इंग्रजांना पकडून देऊ लागला किंवा मारू लागला. असेच त्याने विश्वास घात करून क्रांतिकारक आबासाहेब यांना जेवणासाठी आमंत्रण दिले. "आबा तुम्ही काल तारळ्याचं शिवार गाजवलं, हे ऐकून मला फार आनंद झाला आहे; पण तुम्ही मला भेकड, भुरटा समजू नका. मी माफी मागितली खरी पण ती निराळ्या दृष्टीने मागितली आहे. केवळ तुरुंगात बसून राहण्यापेक्षा सरकारला चुकवून बाहेर येऊन दारूगोळ्याची मदत घेऊन सरकार विरोधात कार्य चालवावं, असा विचार करून मी माफी मागून सुटलो आहे. पण हे कोणीच समजून न घेता मला भुरटा म्हणून माझी बदनामी करू लागले आहेत. आपण मला आपलं समजावं व माझ्याशी मित्र या नात्याने वागावं, आता घरी चला, जेवा व नंतर आपल्या मार्गाने जा."[२] असे खोटेनाटे सांगून क्रांतिकारक आबासाहेब यांना त्यांच्या गावी चिखलवाडीला घेऊन गेला व जेवण करत असतानाच गोळी घालून विश्वासघात केला. या प्रसंगातून अण्णा भाऊ साठे यांना सूचित करायचे की वारणेच्या खोऱ्यातील क्रांतिकारक हे स्वातंत्र्य लढ्यामध्ये मरणाची भीती न बाळगता उतरतात पण स्वकीयांकडून विश्वास घात करून मरण पत्करावे लागले हे मात्र दुर्दैव आहे. या प्रसंगाच्या रूपाने क्रांतिकारकांच्या जीवनातील दुःखद अनुभवांचे चित्रण केले आहे. म्हणजे क्रांतिकारकांना स्वकीयांशी किती तरी संघर्ष करावा लागला आणि आपल्याच मित्रांनी आपल्याच मित्राचा आपल्या स्वार्थापोटी, इंग्रजांपासून आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी, आपली जमीन, सावकारकी अबाधित ठेवण्यासाठी विश्वासघात केला. या कादंबरीतील पात्र हिंदुराव क्रांतिकारकांचे दुःखद अनुभव कथन करते. "मी सरकारी सैनिकांना कस्पटाप्रमाणे समजतो. मला त्याची मुळीच भीती वाटत नाही. पण मी ह्या उशाखालच्या सापांना फार भितो आणि तीच भीती खरी ठरली. अरेरे! पाटलाने शेवटी घात केला. मी रोज सांगत होतो, की आम्ही आपलं डोकं शाबूत ठेवलं पाहिजे, नाही तर ते केव्हा फुटेल याचा नेम नाही. याचा अर्थ असा नव्हे, की मी मरणाला भितो. मी जीव द्यायलाही भीत नाही आणि जीव घ्यायलाही भीत नाही."[३] हे क्रांतिकारकांचे दुखत अनुभव वारणेच्या खोऱ्यात या कादंबरीत अशा विविध प्रसंगातून अण्णा भाऊ साठे यांनी चित्रित केले आहेत. म्हणजेच क्रांतिकारकांना ब्रिटिशांसोबतच स्वार्थी स्वकीयांसोबत ही संघर्ष करावा लागत होता.

वारणेच्या खोऱ्यात ही कादंबरी हिंदुराव यांची शौर्य कथा आहे. एका शेतकरी पाटील कुटुंबात जन्मलेला, घरात जमिनदारी, श्रीमंती असूनही स्वातंत्र्याच्या ध्येयापोटी सामाजिक बांधिलकी म्हणून तो घराबाहेर पडतो. घरातून अदृश्य होतो. तो ध्येयवादी, जिद्दी, महत्वकांक्षी, अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा, ब्रिटिशांची गुलामगिरी नाकारून स्वातंत्र्याचे समर्थन करणारा, स्त्रित्वाचा सन्मान करणारा, कर्तबगार, निर्भिड हिंदुराव हे पात्र या कादंबरीत अण्णा भाऊ साठे यांनी निर्माण केले. त्यांच्या साहित्यातील नायक हे नजरेत भरणारे आहेत. अन्यायाविरुद्ध लढा देणारी

पुरुष पात्रे त्यांच्या साहित्यातून आली आहेत. या कादंबरीतील हिंदुराव, आबासाहेब, गणू, शिवा, मल्हारी ही अशीच पुरुष पात्र अण्णा भाऊ साठे यांनी निर्माण केली आहेत. या कादंबरीतील स्त्री पात्रे ही धाडसी, रूढी-परंपरांना नाकारणारी आहेत. पुरुषी व्यवस्थेच्या जोखडाखाली स्त्रियांवर होणारे जुलूम या कादंबरीत मंगला नाकारते. वाईट प्रवृत्तीच्या पुरुषांबरोबर म्हणजे नागोजी पाटील यांच्या सोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार देते. स्वतः आपल्या प्रियकराची निवड करून त्याच्या सोबत लग्न करते. हा समाजातील क्रांतिकारी बदल अण्णा भाऊ साठे यांच्या या कादंबरीतून आला आहे. स्त्रियांना समतेचे हक्क मिळाले पाहिजेत यासाठी निर्भयपणे लढणारी स्त्री पात्र म्हणून मंगला या कादंबरीत आली आहे. अण्णा भाऊ साठे यांनी वारणेच्या खोऱ्यात हीच कादंबरी पुढे मंगला नावाने प्रसिद्ध केली. मंगला क्रांतिकारी, धाडसी, देशासाठी लढणाऱ्या पुरुषावर प्रेम करते आणि लग्न करते. नागोजी पाटील मंगला मिळावी म्हणून गुंड घेऊन त्यांच्यावर आक्रमण करतो. तेव्हा मंगला आपल्या पतीसोबत म्हणजेच हिंदुराव सोबत त्यांचा सामना करते. रानावनात हे क्रांतिकारक आपले जीवन जगतात. या क्रूर प्रवृत्ती सोबत लढत राहतात. त्याच्याकडून मरण्यापेक्षा स्वतः दोघेही एकमेकांस गोळ्या घालून वीरमरण पत्करतात. मंगला आपले चारित्र्य टिकवण्यासाठी शेवटी वीर मरण पत्करते. हे क्रांतिकारकांच्या जीवनातील दुःख आहे. आपला सुंदर संसारही त्यांना करता येत नाही. देशासाठी अशा क्रूर प्रवृत्तीमुळे यांना मरण पत्करावे लागले.

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री-पुरुष पात्रे धाडसी, निर्भय, अन्यायाविरुद्ध लढणारे यासाठी वीरमरण पत्करणारी आहेत. त्यांच्या कादंबरीतील स्त्रीयांच्या माध्यमातून त्यांनी विविध परिवर्तनवादी विचार सांगितले आहेत. शाहू-फुले-आंबेडकर यांना अपेक्षित असलेला समाज अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून मांडला. या कादंबरीतून विविध विषयांवर चर्चा करतानाही पात्र मार्क्सवाद, धर्मनिरपेक्षता, सावकारकी, स्वातंत्र्य यावर बौद्धिक चर्चा करतात. या कादंबरीतील हिंदुराव सावकारकी, मार्क्सवाद, देशभक्ती यावर तात्विक मते मांडतो, "कारण आम्ही बंड का केले आहे, हेच लोकांना अद्याप समजले नाही. बाकी सरकार व सावकार यांना ते नीट उमजलं आहे आणि म्हणून ते आम्हांवर सापासारखा डूक धरून आमच्या बेसावधपणाची वाट पाहत आहेत. आमच्या पिढ्यानपिढ्या यांनी हातावर पोट घेऊन दुसऱ्याच्या शेतावर राबावं, आमच्या मालकीचं म्हणून जगात काहीच नसावं असं त्यांना वाटतं, परंतु आज आमच्या हातून खुरपं जाऊन बंदूक आल्याबरोबर सर्वच उलट झालं आहे. ज्या सावकारानं माझ्या वडिलांवर एक खोटी फिर्याद देऊन सात वर्षे खटला चालवला. त्या खटल्यात आमची सारी जमीन गेली आणि आज तेच लोक आमची जमीन आम्हाला परत देऊन माझ्या वडिलांना लवून मुजरा करू लागले आहेत."[४] अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायक सावकारा विरुद्ध बंड करून सर्व सामान्यांच्या जमिनी परत देतात. "माणसाने काहीतरी चांगलं कार्य करून कीर्ती मिळवून मागं ठेवावी किंवा पुढच्या पिढीच्या हितासाठी काही तरी चांगलं करून ठेवावं, की कधीच नासत नाही आणि कधीच स्मरत नाही. असं जर काही असेल तर ते ते मागं ठेवून खुशाल जाव. आजच्या माणसाला, आजच्या जगाला त्याची जरुरी आहे."[५] ही आदर्श सांगणारी पात्रे या कादंबऱ्यात आहेत. अण्णा भाऊ साठे जीवनभर मार्क्सवाद जगले म्हणून त्यांच्या लेखनातून मार्क्सवादी तत्त्वज्ञान आल्याशिवाय राहत नाही. या कादंबरीतही हिंदुराव मार्क्सवादावर बोलतो, "गणू! जगात माणसं दोन प्रकारची आहेत. त्यातील एक जन्मभर काबाडकष्ट करून उपासमारीने जर्जर होऊन मरणारे व मरणानंतरही ज्यांना जाळायला भरपूर जळण मिळत नाही ते आणि ज्यांना, पाऊस, थंडी, वारा काहीच ठाऊक नसतं, ज्याच्या पोटातलं पाणी सुद्धा हालत नाही, जे आहे ते बसून खातात आणि मरणानंतर कापराच्या ढिगात जळतात, ते दुसरे. एक धनी धनवान म्हणून सुखात जगतो आणि कापरात जळतो, तर एक चाकर दरिद्री म्हणून दुःखात जगतो आणि जळणाशिवाय जळतो. ज्या मूठभर लोकांच्या हातात सर्व जमीन आहे ते मालक आहेत. तर कोटमाप लोकांच्या मालकीचे काहीही नाही. फक्त खुरपं आणि दोरी एवढेच त्यांच आहे."[६] त्यासाठी आम्हाला राम राज्य स्थापन करायचं आहे. गावचा सर्व कारभार गाव करील. तिथं रावाचं काय चालणार नाही. तिथ गरीब-श्रीमंत हा भेद राहणार नाही. कोणी कोणाचा धनी राहणार नाही आणि कोणी चाकरही राहणार नाही."[७] हा

क्रांतीकारी विचार अण्णा भाऊ साठे आपल्या लेखनातून मांडतात. ते अंधश्रद्धेवर ही बोलतात, "पाय तिथे परमेश्वर मग भटजीची काय जरुरी आहे आणि भटजीला व पंचांगात पाहूनच जर सर्व करायचं तर माणसाला काहीच करता येत नाही. लग्नच काय, परंतु मुहूर्ता शिवाय ऊसाला पाणी सुद्धा पाजता येणार नाही. आम्हाला मुहूर्ताची वाट पाहत बसावे लागेल. कारण विहीर काढायला, मोठ जुंपायला, नांगरायला, कुळवायला, पेरणी करायला, कुलूप घालायला, साऱ्यालाच मुहूर्त लावून ठेवला आहे आणि रोज उठून मुहूर्त पाहायला म्हटलं तर आमचे बारा वाजतील; अहो मरणासाठी सुद्धा पंचांग चाळावं लागेल. म्हणून म्हणतो, आता नवीन कायदा सुरु करा. काय मंडळी, तुमचं काय मत आहे?"[८] अशा चर्चेतून अण्णा भाऊ साठे अंधश्रद्धा, दैववाद याला विरोध करून विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारतात. समग्र लेखनातून त्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन मांडला आहे.

अण्णा भाऊ साठे यांची 'वारणेच्या खोऱ्यात' ही कादंबरी क्रांतिकारकांच्या दुःखद जीवनावर आहे. हा त्यातील प्रमुख विषय आहे. परंतु या कादंबरीत स्त्रीवाद, अंधश्रद्धा, मार्क्सवाद (साम्यवाद), रामराज्य, स्वातंत्र्य, शेतकऱ्यांचे जीवन, इत्यादी विषयावरही तात्विक चर्चा येते. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या जीवनामध्ये समाजप्रबोधनाचे कार्य आपल्या लेखनातून केले. वारणेच्या खोऱ्यात व मुंबईच्या गिरणी कामगारांत त्यांचे जीवन गेले. त्यांनी वारणेच्या खोऱ्यातील माणूस, तेथील निसर्ग मराठी साहित्यातून अजरामर केला. त्यांचे लेखन परंपरागत लेखनापेक्षा भिन्न समाजोपयोगी होते. त्यांनी समाजात क्रांतिकारी विचार सांगण्यासाठी लेखन केले. म्हणून त्यांना लोकांनी साहित्यसम्राट, जननायक, साहित्यराज इत्यादी उपाधी दिली. त्यांच्या सात कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले. त्यांच्या साहित्याचे परकीय भाषांत भाषांतरे झाली आणि आज अण्णा भाऊ साठे त्यांच्या शाहिरीतून, कथा, कादंबरी, वगनाट्य नाटकांतून जगामध्ये पोहोचले आहेत. आयुष्यभर त्यांनी साम्यवाद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार प्रत्यक्ष कार्यातून व साहित्यातून मांडला. परंतु आज समाजामध्ये अशा किती तरी महापुरुषांना दैववादात, जाती वादात अज्ञानी अनुयायांनी अडकविले आहे. ही मात्र शोकांतिका आहे. म्हणून प्रत्येक अनुयायांनी अण्णा भाऊ साठे यांचे विचार वाचले पाहिजेत व त्याप्रमाणे वर्तन केले पाहिजे. यातूनच खऱ्या अर्थाने त्यांची जयंती, उत्सव साजरी होऊ शकतात. हेच सर्व महापुरुषांना अपेक्षित होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

०१. सुर्वे नारायण, कादंबरीकार अण्णा भाऊ साठे, जननायक अण्णा भाऊ साठे, संशोधन केंद्र, लातूर, २००८, पृ. ७१.
०२. तुपे उत्तम बंडू व इतर (संपा.), लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वाङ्मय, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे, २०१४, पृ. ९२४.
०३. तत्रैव, पृ. ९२४
०४. तत्रैव, पृ. ९२१
०५. तत्रैव, पृ. ९५६
०६. तत्रैव, पृ. ९५८
०७. तत्रैव, पृ. ९५८
०८. तत्रैव, पृ. ९६३

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

May 2020 Special Issue- 27 Vol. 1

# RADIANCE

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Sunita Sangole
Dayanand College of Arts, Latur

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 27 Vol. 1 , RADIANCE**

**Editor - Dr. Sunita Sangole**

**© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-**

**Chief Editor – Arun Godam**
**Latur**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

**EDITION : May 2020**

# Index

1. बालकामगार निर्मुलनासंबंधी कायदे आणि धोरणांचा अभ्यास 17
प्र. प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड

2. आंबेडकरवाद : इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह 23
प्रा.डॉ.रमेश पारवे

3. साहित्य निर्मिती प्रक्रिया 27
प्रा.डॉ. सुनीता सांगोले

4. From Rags to Riches: A Thematic Study of Arthur Miller's *Death of a Salesman.* 34
Dr Prashant M. Mannikar

5. Rabindranath Tagore's Philosophy of love Depicted In The Play Chandalika 39
Dr. Machindra H. Khandagale

6. पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानववाद : 43
डॉ. दिलीप नागरगोजे

7. औद्योगिकीकरण आणि मराठी कादंबरी 47
डॉ. गणेश लहाने

8. The Tradition of Marathi Sugam Sangeet 50
Dr. Devendra kulkarni

9. Active Resistance and Revolutionary Activism in MeenaKandasamy's Poetry 52
Dr. Shivkumar Bhimrao Rautrao

10. मराठी प्रमाणभाषा लेखनाच्या (शुद्धलेखनाच्या) नियमावलीचा नवीन आराखडा 58
प्रा.डॉ.सुभाष माणिकराव कदम

Special Issue 27 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
May 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# मराठी प्रमाणभाषा लेखनाच्या (शुद्धलेखनाच्या) नियमावलीचा नवीन आराखडा

**प्रा.डॉ.सुभाष माणिकराव कदम**
**मराठी विभाग,दयानंद कला महाविद्यालय, लातूर**

---

(टीप : शुद्धलेखनाचे नियम सांगून उदाहरण देताना त्या नियमांप्रमाणे शब्दाचे लेखन केलेले आहे. परंपरागत नियमांप्रमाणे उदाहरणांचे लेखन केलेले नाही. उदा. प्रीती, कीर्ती, पूजा, नीती इत्यादी तत्सम शब्दांचे लेखन नवीन नियमांप्रमाणे प्रिती, किर्ती, पुजा, निती असे केले आहे.)

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने इ. स. १९६२ मध्ये १४ व इ. स. १९७२ मध्ये तयार केलेल्या ४ नियमांचा पुनर्विचार करून नवीन नियम तयार करणे गरजेचे वाटते. नंतरच्या काळात मराठी भाषा अंतर्गत बदलत गेली आहे. तेव्हा शुद्धलेखनाचे नियमही बदललेले आहेत. याचा विचार करून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचा पुनर्विचार करून नवीन नियमावली तयार करण्यात यावी. त्यासंदर्भात भाषा तज्ज्ञांची समिती नेमण्यात यावी. शुद्धलेखन नियमावलीतील उणिवांचा विचार केल्यास सद्य काळात मराठी प्रमाण लेखनाचे नियम बदलणे गरजेचे आहे असे वाटते. सद्य स्थितीत मराठी लेखनात होणाऱ्या चुका लक्षात घेऊन परंपरागत नियमांचा पुनर्विचार केला आहे. त्याशिवाय परंपरागत नियमांवर असलेला संस्कृत भाषेचा पगडा दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजेच तत्सम मुक्त नियम तयार करण्यात यावेत. याचा विचार करून पुढील नियम दिलेले आहेत. शुद्धलेखनाच्या नियमावलीचा नवीन आराखडा पुढीलप्रमाणे-

**अ) अनुस्वारविषयक नियम**

१) ज्या अक्षरांचा उच्चार नाकातून स्पष्टपणे होतो ; त्या अक्षरांवर अनुस्वार द्यावा. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

उदा. आंबा, चिंच, दंगा, गंगा, पंकज, नंदी, बंगला, चांगला, संहिता, अंमल, दंगल, चंगळ, मंगळ, वंदन, चंदन, कुंज, घंटा, अंत, शंख, पंचम, चंड, छंद, अंबुज, तंतू, हिंग, सुंठ, गंमत, करंजी, गुलकंद, कुंकू, तंटा, उंट, कंकण, निबंध, अलंकार, संबध, अंदाज, इत्यादी.

२) नामांचे व सर्वनामांचे अनेकवचनी रूप करताना व आदरार्थी बोलताना अनुस्वार द्यावा.

उदा. नदी- नदींमध्ये, गाव-गावांत, घर- घरांत, माणूस- माणसांचे, कवी- कवींचा, शाळा- शाळांमध्ये, विद्यार्थी- विद्यार्थ्यांचे, पुस्तक- पुस्तकांत, रुपये- रुपयांचे, देश- देशांचे, मूल- मुलांस, गायी- गायींचे, इत्यादी

आदरार्थी - गांधी- गांधीजींचे, शिक्षक- शिक्षकांचे, यशवंत- यशवंतरावांचे, साहेब-साहेबांचे, पंतप्रधान- पंतप्रधानांचा, नेहरू- नेहरूंचे, शहीद- शहीदांचे, लष्कर- लष्करांना, प्रमुख- प्रमुखांचे इत्यादी.

**आ) ऱ्हस्व-दीर्घविषयक नियम**

३) एकाक्षरी शब्दातील इ-कार व उ-कार दीर्घ उच्चारला जातो ; म्हणून तो दीर्घ लिहावा.

उदा. ती, ही, जी, मी, तू, की, जू, पू, ऊ, रू, फू, कू, फी, शी, पी, बी, धू, इत्यादी

४) सर्व तत्सम, तद्भव, देशी, परभाषी शब्दांच्या शेवटी येणारे इ-कार व उ-कार दीर्घ लिहावे.

उदा. आई, वाटी, टोपी, चेंडू, बाळू, वाळू, पिशवी, चुलती, वही, काठी, पेटी, दांडू, गिरणी, सुपारी, दुपारी, माळी, कोळी, झोळी, टोळी, टाळी, पोळी, गोळी, चोळी, होळी, माती, फजिती, होती, नव्हती, कोणी, हरी, घरी, अतिथी, विभक्ती, संधी, कुलगुरू, मधू, कवी, इत्यादी

अपवाद - आणि, नि, हे मराठी अव्यय व संस्कृतमधील परंतु, अद्यपि, तथापि

५) सामासिक शब्द तयार होताना तत्सम, तद्भव, देशी, परभाषी या सर्वच शब्दांतील पूर्व पदही दीर्घान्त लिहावे.

कळसूचीवर त्याचा शोध घ्यावा लागतो. यात काळ, वेळ जातो. ६. मराठी भाषेत एकच कळसूची दाखविणारे सॉफ्टवेअर तयार करणे गरजेचे आहे. इंग्रजी भाषेचे डी. टी. पी. करताना सर्व लिपीत एक कळसुची दाबली की तेच अक्षर येते. पण मराठी भाषेच्या बाबतीत एकच कळसूची दाबल्यास तेच अक्षर येते असे नाही. मराठी भाषेत वेगवेगळ्या संगणकासाठी लिपी तयार करण्यात आलेल्या आहेत. श्री. लिपी, आय. एस. एम., कृतिदेव इत्यादी लिपी आहेत. या लिपी अंतर्गतही वेगवेगळ्या लिपी आहेत ; पण कृतिदेव माहिती असणाऱ्या ऑपरेटर्सना आय. एस.एम. लिपीत टाईप करण्यास अवघड जाते. त्या त्या लिपीची कळसूची पाठ करावी लागते. पण इंग्रजीत मात्र कोणतीही लिपी वापरली तरी एकच कळसूची असते. इंग्रजी टाईप करणाऱ्या ऑपरेटर्सना या प्रश्नाला सामोरे जावे लागत नाही. पण मराठी भाषिकांना या प्रश्नाला सामोरे जावे लागते. ७. इंग्रजी भाषेतील वर्णमाला टाईप करीत असताना कळसूचीवर एक अक्षर टाईप करण्यासाठी एकच कळसूची दाबावी लागते. मात्र मराठीचे एक अक्षर टाईप करण्यासाठी एकच कळसूची दाबल्यानंतर ते अक्षर टाईप होते असे नाही. त्यासाठी दोन-तीन कळसूची दाबाव्या लागतात. उदा. जोडाक्षरांसाठी दोन कळसूची दाबाव्या लागतात . याचे कारण मराठीची अक्षरव्यवस्था आहे. मराठीत स्वतंत्र जोडाक्षरे येतात. इंग्रजीत जोडाक्षर ही संकल्पना नाही. भाषा शास्त्र म्हणून शिकविली पाहिजे. विज्ञानात जसा प्रयोगशिलपणे अभ्यास करता येतो तसा भाषेचा प्रयोगशाळेच्या माध्यमातून अभ्यास करता येतो. महाराष्ट्र सरकारने शाळा, महाविद्यालयातून भाषा प्रयोगशाळेसाठी प्रोत्साहन देऊन अनुदान उपलब्ध करून द्यावे. महाराष्ट्र सरकारने मराठी भाषा विकासासाठी मंत्रालयात स्वतंत्र खाते निर्माण करावे. या खात्यांतर्गत मराठी भाषा विकासासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**संदर्भग्रंथ सूची :**

१ अग्निहोत्री द. ह., 'अभिनव मराठी- मराठी शब्दकोश', व्हीनस प्रकाशन, पुणे, इ.स.१९८३.

२. अर्जुनवाडकर कृष्ण श्री., 'मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद', सुलेखा प्रकाशन, पुणे, १९८७.

३. अर्जुनवाडकर कृष्ण श्री., 'मराठी व्याकरणाचा इतिहास', मुंबई विश्वविद्यालय, मराठी विभाग, मुंबई, ज्ञानमुद्रण,पुणे, एप्रिल १९८२.

४. अर्जुनवाडकर कृष्ण श्री. (संपा.), 'शास्त्रीय मराठी व्याकरण', -मोरो केशव दामले, देशमुख आणि कंपनी, पुणे, इ.स. १९७०.

५. आचार्य मा.ना., 'मराठी व्याकरण विवेक', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट, २००१.

६. तर्खडकर दादोबा पांडुरंग, 'मराठी भाषेचे व्याकरण', मुंबई, १८३६, प्रस्तावना. प्रकाशन नाही.

७. तावरे स्नेहल, 'पत्र : मराठीच्या प्रमाण भाषेचे शुद्धलेखन', दि. २२/१२/२००७. संगणक लि.

८. दामले मोरोपंत केशव, 'शास्त्रीय मराठी व्याकरण', १९११, नागपूर. प्रकाशक नाही.

९. दीक्षित प्र. ना., 'मराठी व्याकरण काही समस्या', शुभदा प्रकाशन, फलटण, १९७५, प्र.आ.

१०. परब प्रकाश, 'मराठी व्याकरणाचा अभ्यास', ओरिएंट लॉंगमन, मुंबई, २००२, प्र.आ.

# Current Global Reviewer

Indexed (SJIF)

ISSN 2319-8648

Impact Factor- 7.139

ISSN 2319-8648

Chief Editor
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999


SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य और विज्ञान महाविद्यालय
(स्वायत्त), नवीन पनवेल

हिंदी विभाग
एवं
आंतरिक गुणवत्ता सुनिश्चयन प्रकोष्ठ (IQAC)
आयोजित
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA)
द्वारा पुरस्कृत

द्वि-दिवसीय अंतर्राष्ट्रीय संगोष्ठी
१४-१५ फरवरी, २०२०

# हिंदी और मराठी दलित साहित्य में अभिव्यक्त क्रांति चेतना



संपादक
डॉ. उद्धव तुकाराम भंडारे

विद्यापीठ प्रकाशन

(ओ.पी.सी.) प्रा.लि.

न्यु कलईवाला, शहाजी राजे मार्ग,

विलेपार्ले (पूर्व), मुंबई - 400057

दूरभाष: 9987478404/9869341047

ई-मेल: vidyapeethprakashan@gmail.com

**प्रथम संस्करण** : 2020

**सर्वाधिकार** : लेखकाधीन

**ISBN** : **978-93-89925-01-2**

मूल्य: ₹ 350/-

Hindi Aur Marathi Dalit Sahitya mein Abhivyaktya
Kranti Chetana

**Edited By : Dr. Udhav Tukaram Bhandare**

**भारत में मुद्रित**

---

विद्यापीठ प्रकाशन (ओ.पी.सी.) प्रा.लि.

न्यु कलईवाला, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - 400057

दूरभाष: 9987478404/9869341047 ई-मेल:
vidyapeethprakashan@gmail.com

क्रियेटिव पारस प्रिंटर्स, लोअर परेल, मुंबई

- दलित चेतना: स्वरूप एवं विकास /८७

  **सायली पवार**
- दलित साहित्य और मार्क्सवादी साहित्य का अंत:संबंध /९२

  **शहिदुल इस्लाम खान**
- दलित साहित्य की प्रेरणा : महात्मा जोतिबा फुले का योगदान /१००

  **डॉ. भारत श्रीमंत खिलारे**
- महात्मा जोतिबा फुले की क्रांति चेतना /१०६

  **डॉ. विद्या शशिशेखर शिंदे**
- दलित साहित्य के प्रेरणापुरूष : महात्मा जोतिराव फुले /१११

  **डॉ.जयराम श्री. सूर्यवंशी**
- सामाजिक न्याय संबंधी डॉ. बाबासाहेब भीमराव रामजी आंबेडकर के विचार

  **मच्छिंद्र गुलाब ठाकरे** /११६
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी साहित्यातील योगदान /१२०

  **डॉ. एस. एम. कदम**
- दलितों के उत्थान में आंबेडकरवादी चिंतकों का योगदान /१२५

  **श्रीलेखा कुमारी**
- दलित साहित्य की सामाजिक प्रेरणा : डॉ. आंबेडकर का सामाजिक योगदान

  **मनोज कुमार एम. जी** /१३०
- राजर्षी छत्रपति शाहू महाराज : दलितोत्थान की बेबाक पहल /१३३

  **डॉ. भाऊसाहेब नवनाथ नवले**
- दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत : छत्रपति शाहू महाराज /१३९

  **डॉ. सूर्यकांत शिंदे**
- दलित साहित्य का सौंदर्यशास्त्र /१४४

  **डॉ. सुनिता आगतराव क्षिरसागर**
- हिंदी और मराठी दलित साहित्य में अभिव्यक्त क्रांति चेतना /१५१

  **डॉ.जयप्रकाश कर्दम**
- 'झोपड़ी से राजभवन तक' आत्मकथा में अभिव्यक्त दलित क्रांति चेतना

  **डॉ.गीतिका तँवर** /१५६
- 'मुर्दहिया' आत्मकथा में क्रांति चेतना /१५९

  **डॉ. मेदिनी शशिकांत अंजनीकर**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी साहित्यातील योगदान

प्रा. डॉ. एस. एम. कदम

मराठी साहित्यात आज विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झालेले आहेत. याची सुरूवात स्वातंष्योत्तर कालखंडानंतर झाली आहे. स्वातंष्यपूर्व कालखंडातील मराठी साहित्य लेखकांविषयी विचार केला तर ते एक विशिष्ट वर्गातील होते. पुणे, मुंबई इत्यादी मोठ्या शहरांत राहणारे होते. त्यांची जगण्याची व जीवनानुभव घेण्याची पद्धत भिन्न होती. त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा भिन्न होत्या. १९४५ नंतर साहित्य लेखनाच्या प्रेरणा बदलल्या. दुसरे महायुद्ध, सिगमंड फ्राईडचा मानसशास्त्रीय विचार, कार्लमाक्स यांचा साम्यवादी विचार, आइन ष्टाईनचा भौतिकशास्त्रातील अनु-रेणुमधील शक्तीचा सिद्धांत, विज्ञानाचा पाश्चात्त्य देशात झालेला विकास व त्यांचा भारतीय जीवनावर परिणाम, विज्ञानातून तंत्रज्ञानाचा विकास, औद्योगिकिकरण, शहराची भरमसाठ वाढ यांच्या प्रभावातून व परिणामातून १९४५ चे मराठी साहित्य बदलत गेले आणि याच काळात भारताला १९४७ मध्ये स्वातंष्य मिळाले.

१९४७ नंतर भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. महाराष्ट्रातही शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार स्वातंष्यानंतर झाला. १९५६ ला भाषावार प्रांतरचना झाली. मराठी भाषिकांचे एक स्वातंष्य राज्य असावे म्हणून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ निर्माण झाली. याचा परिपाक म्हणून ०१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राज्य सरकारने शिक्षणाचा प्रसार केला. यासाठी गावागावात प्राथमिक व माध्यमिक शाळांची निर्मिती केली. शासनाच्या शिक्षणाच्या प्रयत्नासोबतच काही समाजसुधारकांनीही शिक्षणामध्ये योगदान दिले. कर्मवीर भाऊराव पाटील, यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षण गावा-गावापर्यंत पोहंचविले. तसेच बापुसाहेब साळुंके यांनी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. अशा कितीतरी संस्था महाराष्ट्रात उदयास आल्या. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एजुकेशन सोसायटीची स्थापना १९४८ मध्ये केली. या संस्थेअंतर्गत मुंबई आणि औरंबाद येथे महाविद्यालये व वसतिगृह निर्माण केले. या

काव्य, आत्मकथन या वाङ्मय प्रकारातून लेखन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा केली आणि हिंदू धर्म मानसाला माणूस म्हणून वागवत नाही. म्हणून १९५६ मध्ये लाखो अनुयायांसोबत धर्मपरिवर्तन केले आणि बौद्धधर्माची दीक्षा घेतली. आज बौद्ध धर्म भारतात गौतमबुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्वज्ञान आचरण करणारा धर्म आहे. या सर्व विचारप्रवाहाचा, सामाजिक चळवळीचा, वैचारिक लेखनाचा प्रभाव मराठी दलित साहित्य लेखनावर आहे. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, श्यंबक साकाळे, दया पवार, यशवंत मनोहर, ज.वि. पवार, अर्जून डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर इत्यादी कवींनी कवितेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन लेखन केले. दलित समाजाच्या वेदना मांडल्या, अनिष्ठ प्रथेविषयी नकार दिला. आणि अन्यायग्रस्त रूढीविषयी विद्रोह निर्माण केला. दलित आत्मकथनातून दलित समाजातील दुःख मांडले. प्र.ई. सोनकांबळे, दया पवार, माधव कोंडविलकर, लक्ष्मण माने, शंकरराव खरात, कुमुद पावडे, उत्तम बंडू, नानासाहेब झोडगे, मुक्ता सर्वगोड, शरणकुमार लिंबाळे, बेबी कांबळे, लक्ष्मण गायकवाड इत्यादींनी आत्मकथनातून मराठी दलित साहित्याची एक वेगळी ओळख निर्माण केली. एकूणच मराठी साहित्यामध्ये दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच निर्माण झाली. हे सर्व मराठीतील अभ्यासक समीक्षकांना मान्य करावेच लागेल.

**सहाय्यक प्राध्यापक**
मराठी विभाग,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

**संदर्भ सूची**

१. जाधव रा. ग. (संपा) - मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ७, भाग चौथा), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
२. काळे अक्षयकुमार - अर्वाचित मराठी काव्यदर्शन, पा. ना. सनहट्टी प्रकाशन, नागपूर
३. अडसूळ टी. पी. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य
४. जाधव रा.ग. - निळी पहाट : मराठी दलित साहित्याची मीमांसा
५. मनोहर यशवंत - दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप
६. फडके भालचंद्र - दलित साहित्याची प्रकाशयात्रा
७. डांगळे अर्जून (संपा.) - दलित साहित्य : एक अभ्यास




।। विद्या विनयेन शोभते।।

J.B.S.P. SANSTHA
PANVEL, RAIGAD
ज.भ.शि.प्र.संस्था


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था का

# चांगू काना ठाकूर

**कला, वाणिज्य और विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), नवीन पनवेल**

**नैक द्वारा 'अ' दर्जा प्राप्त ३.६१ सीजीपीए विश्वविद्यालय अनुदान आयोग द्वारा 'विशेष गुणवत्ता एवं क्षमता का स्तर प्राप्त'**

**मुंबई विश्वविद्यालय द्वारा 'सर्वोत्तम महाविद्यालय' सम्मान प्राप्त**

प्लॉट नं.०१, सेक्टर नं.११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, पश्चिम, रायगड, महाराष्ट्र-४१०२०६
(०२२) २७४६४१९३, २७४५५७६०,२७४६१५६९
Email: principalckthakurcollege@rediffmail.com
Web:www.ckthakurcollege.net



आवरण: राजेश कुमार
₹ 350/-
ISBN:978-93-89925-01-2
9 789389 925012
विद्यापीठ प्रकाशन
(ओ.पी.सी.) प्रा.लि.